संस्थापक : साने गुरुजी

# साधना

शनिवार
३१ जानेवारी २००९
मूल्य रु. ८/-

३० जानेवारी : हुतात्मा दिन
विनम्र अभिवादन



## विसाव्या शतकातील सर्वश्रेष्ठ योद्धा!

''गांधी केवळ शांतात्मे होते असे कित्येक जण म्हणतात, पण ते केवळ असत्य आहे. सीझरला ज्याप्रमाणे शांततावादी म्हणता येत नाही, त्याचप्रमाणे गांधींनाही शांततावादी म्हणता येणार नाही. गांधी हे त्यांच्या काळी जिवंत असणाऱ्यांत अत्यंत जोरदार लढवय्ये होते. त्यांना 'इतिहासातील सर्वांत मोठी विभूती' असे म्हणावे लागेल. असा युद्धशास्त्रज्ञ पूर्वी कधी झाला नाही. गांधींनी जे नवे शस्त्र शोधले आहे, त्याच्याशी तुलना करता, तुमच्या या पाणबुड्या, तुमची ही क्षेपणास्त्रे, तुमची ही आरमारे, तुमच्या या तोफा म्हणजे लहान मुलांची खेळणी वाटतात.

गांधींनी आयुष्यभर अन्यायाशी युद्ध चालविले. कर्मशून्य आणि प्रतिकारहीन शांतिब्रह्माशी तर त्यांना काही एक करावयाचे नसे. एखादा सेनापती स्वत:च्या फौजांना जसे शिक्षण देतो, तसेच व तितक्याच दक्षतेने गांधी आपले सैन्य तयार करीत असत.''

**– डॉ. हेन्री थॉमस**

# वारी एक आनंदयात्रा

**बुकशेल्फ २००८ वर्षभराचा आढावा घेताना लक्षवेधी ठरलेल्या पहिल्या दहा पुस्तकात समावेश झालेले पुस्तक.** (शिफारस - मुंबई टाइम्स)

## संवाद तरुणाईशी

तरुण पिढीच्या पालकत्वाविषयी

रेणू दांडेकर

किंमत १०० + पोस्टेज ३० रुपये

वयात आलेल्या आपल्या मुलांबरोबर वागताना-जगताना आई-वडिलांना अनेक प्रश्न पडतात, ताणतणाव तयार होतात, वाद होतात. असे घडायला नको म्हणून या वयातल्या पालकत्वाविषयीचा विचार या पुस्तकातून केला आहे.



## थोर चित्रकार चोर

अनु. दीपक घारे

किंमत १३० + पोस्टेज ३० रुपये



पिकासो, शगाल अशा प्रख्यात चित्रकारांच्या शैलीची सही सही नक्कल करणाऱ्या डेव्हीड स्टीनच्या आत्मकथनाच्या निमित्ताने आधुनिक चित्रकला, कलेचा बाजार आणि त्यातल्या अनिष्ट प्रवृत्ती यांचा एक रोचक आलेख या पुस्तकात येतो.

मोहक भूलथापांना बळी न पडता खरे उपचार काय, याचा शोध घ्यायला मदत करणारा हा विक्रम वेताळ संवाद। वेताळ कथांइतकाच रसपूर्ण आणि उद्बोधकही.



## वेताळाच्या आरोग्यकथा

रवींद्र रुक्मिणी पंढरीनाथ

किंमत १६० + पोस्टेज ३० रुपये



सर्व प्राणीमात्रांना जगविणाऱ्या भूमीशी एकरूप होऊन गेलेल्या शेतकऱ्याचे आणि त्याच्या कष्टप्रद व मातीने माखलेल्या जीवनाचे सर्वांगीण दर्शन घडविणारे अनोखे आणि अद्वितीय पुस्तक.

## तिफनसाज

इंद्रजित भालेराव

किंमत १६० + पोस्टेज ३० रुपये

**साधनाच्या सभासदांना मनोविकासची सर्व पुस्तके २५% सवलतीत**

खालील पत्त्यावरच मनोविकासची सर्व पुस्तके मिळतील.

मनोविकास प्रकाशन

३ए शक्ती टॉवर्स, ६७२नारायण पेठ, पुणे३० फोन -०२०-६५२६२९५० मुंबई-०२२-६४५०३२५३

मनोविकास बुक सेंटर, आमदार निवास आवार, चर्चगेट, मुंबई मोबाईल-९९६७०८१५२७

# आधुनिक राष्ट्रनिर्मितीच्या वाटचालीसाठी...

**स्थापण्या**
**समता शांती**
**ठेवुनी शुद्ध**
**साधनां ।**
**करिती साधना**
**त्यांना ठेवो**
**उत्स्फूर्त**
**साधना**

लोकसभा निवडणुकांचे पडघम वाजू लागले आहेत. स्वाभाविकच 'धर्मनिरपेक्षता' हा शब्द आता परवलीचा बनेल. काँग्रेस पक्ष स्वत:ला धर्मनिरपेक्षतेचा रखवालदार समजतो. या पक्षाचा गेल्या काही दशकांतला व्यवहार पाहता हे श्रेय त्या पक्षाला देता येणे अवघड आहे. मग अन्य काही पक्ष वा त्यांच्या आघाड्या स्वत:च्या कट्टर धर्मनिरपेक्षतेची ग्वाही देत 'आम्हीच खरे' असा पुकारा करतात. या राजकीय रणधुमाळीत धर्मनिरपेक्षतेचा आशय जनमानसात रूजवणे आणि प्रशासकीय पातळीवर धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वाची खंबीर अंमलबजावणी करणे हे मात्र दूरच राहते. याची गरज अधोरेखित करणाऱ्या काही घटना अलीकडेच घडल्या, त्यापासून योग्य तो बोध घ्यावयास हवा.

भारतीय लष्करातील निलंबित लेफ्टनंट कर्नल प्रसाद पुरोहित, साध्वी प्रज्ञा ठाकूर यांच्यासह अकरा जणांविरुद्ध आरोपपत्र सादर करण्यात आले. आरोपपत्रावरून हे स्पष्ट दिसते की, या दहशतवादी हिंदू गटाच्या कारवाया ही तात्कालिक प्रतिक्रियावजा घटना नसून व्यापक उद्दिष्टे समोर ठेवून केलेल्या सुनियोजित कारस्थानाचाच भाग आहेत. दहशतवादविरोधी पथकाने केलेल्या तपासात या बाबी उघड झाल्या आहेत की, मालेगाव प्रकरणातील आरोपींचे मनसुबे 'हिंदू राष्ट्र' स्थापन करण्याचे होते. आपल्या मोहिमेसाठी त्यांनी नेपाळमधील माओवाद्याशी संपर्क साधला होता. इस्रायलची मदत घेण्याची त्यांची इच्छा होती. 'सशस्त्र आर्यवर्त' या नावाने हिंदू राष्ट्र त्यांना निर्माण करावयाचे होते. या राष्ट्राचा ध्वज कसा असेल हेही त्यांनी ठरविले होते. भारताची घटना ही या मंडळींना अमान्य होती.

वैचारिक पातळीवर देशाच्या घटनेतील काही तत्त्वे मान्य नसणे, हा गुन्हा नाही. लोकशाही मार्गाने त्याबाबत बोलता येते. प्रचार करता येतो. मात्र भारतीय संविधानाच्या पायाभूत मूल्यांच्या बाबतीत परिस्थिती वेगळी आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या पूर्ण खंडपीठाने धर्मनिरपेक्षता हे तत्त्व भारतीय घटनेचा अंगभूत भाग असल्याची ग्वाही दिली आहे. ते संसदेलाही बदलता येणार नाही. यामुळे धर्माधिष्ठित राष्ट्र भारतात स्थापन करावयाचे तर सशस्त्र उठावच करावा लागेल. मालेगाव बाँबस्फोटातील आरोपीवरील आरोपपत्र असे सांगते की, ही मंडळी तेच करू पहात होती हे वाटते तेवढे पोरकट व हास्यास्पद नाही. गांभीर्याने नोंद घ्यावे असे आहे.

धर्मनिरपेक्षतेच्या मूल्यांचे पोषण करण्याच्या सातत्याच्या प्रयत्नांमुळे भारताला जगात मानाचे स्थान मिळाले आहे. धर्माच्या आधारावर स्वतंत्र झालेल्या पाकिस्तानला आपला देश एकसंध राखता आलेला नाही. देशातील लोकशाही सांभाळता आलेली नाही. इस्लामी दहशतवाद्यांना पोसण्यातही त्यांचा हातभार लागला आहे. सर्वच आघाड्यांवर पाकिस्तानची

**३१ जानेवारी २००९**
वर्ष ६१ / अंक २५

● संपादक :
**नरेंद्र दाभोलकर**

● युवा संपादक :
**विनोद शिरसाठ**

हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक नरेंद्र दाभोलकर यांनी साथीदार प्रिंटर्स, पुणे ३० येथे छापून, **साधना साप्ताहिक, ९२६ सदाशिव पेठ, बॅ.गाडगीळ रस्ता, पुणे ४११०३०.** येथे प्रकाशित केले.
दूरध्वनी : **वर्गणी, पत्ता व अंकासंबंधी, (०२०) २४४५१७२४.** संपादक : टेलिफॅक्स : २४४३२४०२
E-mail : weeklysadhana@gmail.com साधना मीडिया सेंटर :- (०२०) २४४५९६३५ / ४१
web : www.sadhanatrust.com
वार्षिक वर्गणी : व्यक्तिगत रु. ४००/-, संस्थांसाठी रु. ५००/-
(अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
मुखपृष्ठ : शेखर गोडबोले : Mob. 9822503398 रेखाचित्रे : गिरिश सहस्रबुद्धे : Mob. 9850150488

पिछेहाट झाली आहे. पण याच काळात भारताने जगात मानाचे स्थान मिळवले आहे. देश आर्थिक महासत्ता होण्याच्या मार्गावर आहे. स्वातंत्र्यलढ्यात भारतामध्ये ज्या मूल्यांची निर्मिती झाली आणि जी स्वातंत्र्योत्तर भारताने सांभाळली त्यांचा या उज्ज्वल वाटचालीत महत्त्वाचा वाटा आहे. विविध धर्म, जात, वंश, भाषा यांची सांस्कृतिक अस्मिता या देशाने सांभाळली, जोपासली, वाढवली. त्या सर्वांसोबत 'भारतीय' अशी अधिक व्यापक ओळख देशातील जनतेने स्वीकारावी हा प्रयत्न झाला. तो काही प्रमाणात यशस्वी झाला. अन्यथा भारत हा 'देश' म्हणून उभाच राहू शकला नसता. धर्मनिरपेक्षतेचा नेमका आशय काय? यावर भले चर्चा होत राहील, पण उदारमतवादी, आधुनिक लोकशाहीच भारताला तारेल हा आतापर्यंतच्या वाटचालीतून मिळालेला धडा आपण मनोमन स्वीकारावयास पाहिजे. मालेगाव बॉंबस्फोटातील आरोपी नेमके याच पायाभूत गृहितकाला तडा देत आहेत.

मात्र खरी चिंता त्यापुढची आहे.

भारतीय जनता पक्ष, शिवसेना व इतर हिंदुत्ववादी संघटना यांनी मालेगाव स्फोट प्रकरणातील तपास यंत्रणेवरच राजकीय लाभासाठी आगपाखड केली. आरोपींना न्यायालयात नेत असताना त्यांच्यावर फुले उधळली. आरोपींचे उदात्तीकरण करताना 'आपण देशाच्या घटनेचा अवमान करीत आहोत' याचेही भान या मंडळींना राहिले नाही. त्यावेळी निदान आरोपपत्र दाखल तरी व्हावयाचे होते. हिंदू राष्ट्र स्थापनेचा कट रचल्याच्या आरोपावरून यांच्यावर देशद्रोहाचे आरोपपत्र दाखल झाल्यावर, प्रतिक्रिया काय हवी होती आणि काय होती! आरोपाची सत्यासत्यता, लावलेली कलमे योग्य की अयोग्य, गुन्ह्यांना शिक्षा कोणती हे सर्व विषय न्यायालयीन कक्षेतच येतात. कायद्याने योग्य ती कारवाई होणे हेच उचित व श्रेयस्कर आहे हे सामान्य माणसालाही समजते. अशावेळी महाराष्ट्रातील एक प्रमुख राजकीय पक्ष असलेल्या शिवसेनेचे कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी या आरोपपत्राबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. 'त्यांना देशद्रोही कसे काय ठरवता? शिवसेनाप्रमुख भारताला हिंदू राष्ट्र मानतात. आमचे राष्ट्र हे हिंदु राष्ट्रच असताना असा कट रचण्याची गरजच काय?' असे प्रतिप्रश्न उद्धव ठाकरे यांनी विचारले आहेत. योगायोगाने याचवेळी बराक ओबामा आपली राष्ट्रपतीपदाची शपथ घेताना केलेल्या भाषणात आग्रहपूर्वक सांगत होते, 'आमचा देश ख्रिश्चन, मुस्लिम, हिंदू, ज्यू आणि नास्तिक या सर्वांचा आहे.' अमेरिकेतील ९० टक्के जनता ख्रिस्ती आहे. मुस्लिम दहशतवाद्यांच्या अत्यंत भीषण हल्ल्याला अमेरिकेने तोंड दिले आहे. अशा पार्श्वभूमीवर ओबामांनी केलेले विधान आधुनिक राष्ट्रनिर्मितीच्या वाटचालीसाठी आवश्यक असलेला शहाणपणा दाखवते.

सारांश, धर्मनिरपेक्षतेला केवळ संविधानाच्या आधारे आपण गृहीत धरून चाललो आहोत आणि लोकमानसात व राज्यकर्त्यांत त्याचा आग्रह क्षीण होत चालला आहे का, याचा गांभीर्याने व अंतर्मुख होऊन सर्वांनी विचार करावयास हवा.

राष्ट्रीय पातळीवरील 'धर्मनिरपेक्षता आयोगाची' कल्पना साकार झाल्यास या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल पडेल असा आम्हाला विश्वास वाटतो.


**वैचारिक व परिवर्तनवादी साप्ताहिकाला हार्दिक शुभेच्छा !**

**आयुर्विमा कर्मचारी मित्रमंडळ**

| | |
|---|---|
| शशीधर राणे | दत्तात्रय काठाळे |
| दिलीप गोडांबे | विठ्ठल रावराणे |
| विनायक चित्रे | गोपीनाथ मोरे |
| हेमंत इनामदार | प्रताप देशपांडे |

दिल्ली दरवाजातून...

# २००९ मधील दोन प्रमुख आव्हाने

२००९ वर्ष सुरू झाले आहे. या वर्षात भारतवासीयांसाठी काय वाढून ठेवले आहे असा विचार केल्यास दहशतवाद आणि आर्थिक मंदी या दोन प्रमुख आव्हानांचा विचार करावा लागेल. पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्यासह त्यांच्या आर्थिक सल्लागारांनी कमीतकमी आणखी १२ ते १५ महिने तरी आर्थिक मंदीचा सामना देशाला करावा लागेल असे सांगतानाच मंदीचा खरा फटका अद्याप बसायचा आहे असा इशाराही दिला आहे. आर्थिक मंदीचा काळ साधारणपणे वीस ते चोवीस महिन्यांचा असेल असे सांगितले जात होते व अर्थतज्ज्ञांच्या मते त्यातले सहा महिने तर पार पडले आहेत. अद्याप बारा ते पंधरा महिन्यांचा काळ शिल्लक आहे. याचाच अर्थ २०१०च्या मार्चपर्यंत मंदीचे फटके कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सहन करावे लागणार आहेत. मुंबई हल्ल्यांनी दहशतवादाचे एक नवे आक्राळविक्राळ रूपच सर्वासमोर प्रकट केले आहे. या हल्ल्यांचे सर्वंकष स्वरुप लक्षात घेऊन भविष्यात देखील कोणत्या प्रकारच्या दहशतवादास तोंड द्यावे लागेल याचे चित्र लोकांसमोर ठेवले आहे. त्याचबरोबर दहशतवादाचा मुकाबला ही केवळ सरकारचीच जबाबदारी आहे हा समजही कसा अयोग्य आहे हेही या निमित्ताने स्पष्ट झाले आहे. दहशतवादाच्या मुकाबल्यात सरकारला जनतेची साथ-संगत व सहभाग प्राप्त न झाल्यास एकटे सरकार दहशतवादाचा मुकाबला करण्यास पुरे पडू शकणार नाही. दिवसेंदिवस दहशतवादाच्या नांग्या लांबलांब होताना आढळत आहेत. हे संकट किंवा समस्या केवळ भारतापुरती मर्यादित नाही तर जगाला त्याचा धोका आहे. जगात इतरत्र या धोक्याचा मुकाबला कसा होतो हे लक्षात घेऊनच सामान्य नागरिकांनाही स्वतःला तयार करावे लागणार आहे.

**आगामी वर्षात सामान्य माणसाला आर्थिक आघाडीवर विलक्षण काटकसर करण्याबरोबरच सावधगिरीनेच सर्व आर्थिक व्यवहार करावे लागणार आहेत. दुसरे आव्हान अंतर्गत सुरक्षिततेबद्दलचे आहे. मुंबईवरील हल्ल्यानंतर हे आव्हान अतिशय ठळकपणे सर्वांसमोर उभे ठाकले आहे. मुंबईवरील हल्ल्यांनी सुरक्षायंत्रणांची अकार्यक्षमता सिद्ध झाली. त्यावरून सुरू झालेल्या वादाचे ध्वनी-प्रतिध्वनी अजूनही ऐकायला येत आहेत. परंतु हे निररर्थक वाद करण्याऐवजी भविष्यात असले हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी काय करता येईल आणि या हल्ल्यांपासून केणता धडा देशाने शिकला आहे यावर फार कमी विद्वानांनी चर्चा केलेली आहे. भारताला साडेसात हजार किलोमीटरचा समुद्रकिनारा आहे. एका सुरक्षातज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे एवढी मोठी किनारपट्टी सीलबंद करणे अमेरिकेसारख्या देशालाही शक्य नाही.**

दहशतवादाच्या आघाती स्वरूपापेक्षा देशाला पोखरणारे आर्थिक संकट अधिक त्रासदायक आहे. काही चटकन समजेल अशी आकडेवारी पाहिली तरी त्याचे गंभीर स्वरूप लक्षात येईल. वस्त्रोद्योग क्षेत्राचे उदाहरण घेऊ. भारतीय निर्यातीच्या क्षेत्रातील हा एक प्रमुख घटक असून देशाला परकीय चलन मिळवून देणारे हे क्षेत्र आहे. जागतिक मंदीमुळे ही निर्यात स्थगित अवस्थेत आहे किंवा मंदावलेली आहे. प्रामुख्याने लघुउद्योग क्षेत्रातील हा उद्योग आहे आणि व्यापक रोजगाराचे साधन म्हणून त्याकडे पाहिले जाते. निर्यात मंदावल्याने या उद्योगाकडील मागणी थंडावली आहे, परिणामी हे लहान उद्योग बंद पडत आहेत आणि गेल्या सहा महिन्यांचा आढावा घेतल्यास पाच लाखांपेक्षा अधिक लोक यात बेकार झाले आहेत. आगामी काळात आणखी किती बेकार होतील याचा अंदाज लावता येणार नाही. साधारणपणे देशात या उद्योगात चाळीस ते पन्नास लाख लोकांना रोजगार मिळतो. निर्यात क्षेत्रातले वस्त्रोद्योग हे एक उदाहरण झाले. इतर क्षेत्रांमध्ये देखील मंदीमुळे उद्योग बंद पडून लोकांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली आहे. गेल्या वर्षी डॉलरच्या तुलनेत रुपया मजबूत झाल्यानंतर निर्यातक्षेत्राला मोठा फटका बसला होता आणि त्यामुळे देखील बेकारी झाली होती. त्याच्या पाठोपाठ मंदीची लाट आल्याने या क्षेत्राची आणखी वाताहात होताना दिसत आहे. बेकारी हा मंदीचा एक प्रमुख परिणाम आहे. इतरही परिणाम आहेत. परंतु सामान्य माणसाला त्याचा सर्वांगीण फटका बसतो. नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष मॉंटेकसिंग अहलुवालिया यांनी मंदीवरील उपाययोजनांचे पॅकेज जाहीर करताना देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासदरात सुमारे दीड ते दोन टक्क्यांनी कपात होणार असल्याने त्याची परिणती उद्योग बंद पडण्यात आणि बेकारीत होणे अटळ आहे असे सांगितले होते. सामान्य माणसाच्या

भाषेत सांगायचे झाल्यास मंदीमुळे एकतर उद्योग बंद पडतील किंवा मोडकळीस येतील, तसेच लोकांना नोकरकपात किंवा वेतनकपात या समस्यांचाही मुकाबला करावा लागेल. मंदीला तोंड देण्यासाठी सामान्य माणसाला 'बचत, बचत आणि बचत' हा एकच मार्ग उपलब्ध आहे असे तज्ज्ञांतर्फे सांगितले जात आहे. परंतु नव्या आर्थिक धोरणानुसार बाजारात मागणी निर्माण करण्यासाठी स्वस्त व्याजदराची कर्जे उपलब्ध करून देण्याच्या योजना जाहीर केल्या जात आहेत. म्हणजेच घरे विकत घेण्यासाठी कमी व्याजदरात कर्जे उपलब्ध करून दिल्यास लोक घरे विकत घेऊ लागतील आणि त्यातून बांधकाम व्यवसायाला चालना मिळेल. परिणामी, सिमेंट, लोखंड-पोलाद व बांधकामाशी निगडित उद्योगांना गती मिळेल, परिणामी अर्थव्यवस्था गतिमान होईल अशी अटकळ बांधून उपाययोजना जाहीर केल्या गेल्या आहेत. परंतु पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे प्रमुख सुरेश तेंडुलकर यांनी पुढील किमान बारा महिने तरी मंदीचे प्रतिकूल परिणाम सहन करावे लागतील असा इशारा दिलेला आहे. थोडक्यात, आगामी वर्षात सामान्य माणसाला आर्थिक आघाडीवर विलक्षण काटकसर करण्याबरोबरच सावधगिरीनेच सर्व आर्थिक व्यवहार करावे लागणार आहेत.

दुसरे आव्हान अंतर्गत सुरक्षिततेबद्दलचे आहे. मुंबईवरील हल्ल्यानंतर हे आव्हान अतिशय ठळकपणे सर्वांसमोर उभे ठाकले आहे. मुंबईवरील हल्ल्यांनी सुरक्षायंत्रणांची अकार्यक्षमता सिद्ध झाली. त्यावरून सुरू झालेल्या वादाचे ध्वनी-प्रतिध्वनी अजूनही ऐकायला येत आहेत. परंतु हे निरर्थक वाद करण्याऐवजी भविष्यात असले हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी काय करता येईल आणि या हल्ल्यांपासून कोणता धडा देशाने शिकला आहे यावर फार कमी विद्वानांनी चर्चा केलेली आहे. भारताला साडेसात हजार किलोमीटरचा समुद्रकिनारा आहे. एका सुरक्षातज्ज्ञांनी म्हटल्याप्रमाणे एवढी मोठी किनारपट्टी सीलबंद करणे अमेरिकेसारख्या देशालाही शक्य नाही. याचा आशय असा की समुद्रकिनाऱ्याच्या गस्तीसाठी केवळ कोस्टगार्ड किंवा नौदल हे पुरेसे पडणार नाही. त्यासाठी तेथे राहणारे मच्छिमार, नागरिक यांचाही सहभाग आवश्यक असेल. केवळ समुद्रकिनाऱ्यापुरतीच ही बाब मर्यादित नाही तर शहरांमध्ये व विशेषत: दहशतवाद्यांच्या टार्गेटवर असलेल्या संभाव्य शहरांमधील नागरिकांनीही सावध असणे आणि सुरक्षायंत्रणांना साथ देणे अपेक्षित आहे. सुरक्षायंत्रणांना नावे ठेवून किंवा शिव्या देऊन दहशतवादी हल्ले थांबणार नाहीत. अमेरिकेत न्यूयॉर्कमधील वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ल्यांनंतर पुन्हा तसा हल्ला झाला नाही असे सातत्याने काही मंडळी सांगत असतात. परंतु अमेरिकेत लागू केलेले अंतर्गत सुरक्षाविषयक कायदे भारतात लागू केल्यास मानवाधिकारांचे उल्लंघन होत असल्याची तक्रार करीत अनेक संघटना उभ्या राहतील. काही अत्यावश्यक असे सुरक्षाविषयक कायदे लागू केल्यास नागरिकांना काही प्रमाणात आपल्या व्यक्तिस्वातंत्र्याला मुरड घालावी लागेल. त्याची तयारी आहे का हे प्रथम भारतीय नागरिकांना ठरवावे लागेल. भारतात कोणाला ओळखपत्र मागितले तर राग येतो. परंतु ओळखपत्र मागणारा सुरक्षा रक्षक सुरक्षेच्या कारणास्तवच आपले कर्तव्य बजावीत असतो हे लोकांना कळत नाही. अमेरिकेत विमानतळांवर अतिशय कडक अशा शारीरिक झडतीतून जावे लागते. जॉर्ज फर्नांडिस संरक्षणमंत्री असताना त्यांना याचा प्रत्यय आला होता. परंतु सामान्य माणसाला तेथे तक्रार करायलाही जागा ठेवली जात नाही. सुरक्षेचे नियम पाळायचे म्हणजे पाळायचे, त्यात कोणतीही तडजोड चालणार नाही असा दंडकच केला जातो. अर्थात केवळ या गोष्टींमुळेच तेथे दहशतवादी हल्ले रोखले गेले असे नव्हे. त्याला इतरही कारणे आहेत. त्यामध्ये अमेरिकेची आंतरराष्ट्रीय दहशत व धाक हे प्रमुख कारण आहे. पण लोकांनी साथ दिली तरच सुरक्षा यंत्रणा कार्यक्षमतेने काम करू शकतील ही बाब महत्वाची आहे.

भारतात दहशतवादी हल्ले रोखण्यासाठी गुप्तचर यंत्रणा प्रभावी करणे ही प्रमुख गरज आहे आणि नवे गृहमंत्री पी.चिदंबरम यांनी त्यावरच धडाका लावला आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एम.के. नारायणन यांना अंतर्गत सुरक्षेच्या जबाबदारीतून मुक्त करून चिदंबरम यांनी त्यासाठी स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे व आता या प्रक्रियेला आपण काहीतरी वेगळे वळण लावू इच्छितो हे त्यांनी स्पष्ट केले आहे. गुप्तचर यंत्रणा सक्षम करण्यासाठी 'ह्युमन इंटेलिजन्स' किंवा 'खबऱ्यां'चे जाळे अतिशय प्रभावी असावे लागते, चिदंबरम यांनी त्यावर भर दिला आहे. त्याचबरोबर सुरक्षा दलांच्या आधुनिकीकरणाचा धडाकेबाज कार्यक्रमही त्यांनी चालू केला आहे. विशेष म्हणजे पंतप्रधानांचे त्यांना पूर्ण पाठबळ मिळाले आहे.

२००९ मध्ये हीच दोन प्रमुख आव्हाने आहेत. पाकिस्तानमधील अस्थिरता भारताच्या मुळावर येऊ पहात आहे. तेथे कट्टरपंथीयांच्या हाती कारभार जाणे हाच भारताला सर्वाधिक धोका आहे आणि तसे घडल्यास या उपखंडात काहीही होऊ शकते. अमेरिकेत आलेले नवे अध्यक्ष त्यामुळे त्यांचे आसन स्थिरस्थावर होईपर्यंत लागणारा वेळ पाहता पाकिस्तानच्या दृष्टीने येणारा प्रत्येक दिवस निर्णायक आहे. भारतालाही पाकिस्तानातील घडामोडींवर अतिशय बारकाईने लक्ष ठेवावे लागणार आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार अत्यंत बेभरवशाची अशी परिस्थिती पाकिस्तानात आहे. तेथील नेतेही बेभरवशाचे आहेत, त्यामुळे त्यांच्याबरोबर व्यवहार करणे ही अतिशय कठीण बाब होऊन बसली आहे. स्थिती नाजुक असल्यानेच संयम व सबुरीनेच गोष्टी घ्याव्या लागतील, आततायी पावले उचलून चालणार नाही. २००९ची आव्हाने हीच आहेत.

**– निरीक्षक**
नवी दिल्ली.



लक्ष्मीकांत देशमुख

# ब्युरोक्रसी : ए नेसेसरी एव्हिल

।। अध्याय दुसरा ।।

**नोकरशाही ही केवळ राज्याची नसते, ती कंपनी, उद्योगसमूह, प्रतिष्ठाने व अगदी स्वयंसेवी संस्थांची (एन.जी.ओ.ची) पण असते. ती जितकी मोठी तितकी अकार्यक्षम असा अलिखित नियम आहे. तसेच तिला जितके जास्त अधिकार व जेवढी जास्त सुरक्षितता तेवढी बेपर्वाई व भ्रष्टाचार जास्त हेही ठरलेले. पण हे दोष असूनही ब्युरोक्रसीचा एक अपरिहार्य व आवश्यक गरज (नेसेसरी एव्हिल) म्हणून जगात सर्वत्र स्वीकार करण्यात आला आहे.**

भारतीय राज्यघटना व सारनाम्याचा आशय आणि त्यातील अनुस्युत तत्त्वज्ञान म्हणजे ‘लोककल्याणकारी राज्याची निर्मिती करून तळागाळातील लोकांनाही चांगले जीवन प्राप्त करून देणे’, पण सद्य:स्थितीचा सारनामा कसा वर्णिता येईल?

माजी निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन अतिशय मार्मिकपणे तो एका लेखात मांडताना म्हणतात, ‘सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय हा मोजक्या भाग्यवंतांच्याच वाट्यास आला आहे. विचार, उच्चार, धर्मपंथ व उपासना करण्याच्या स्वातंत्र्यामुळे मानवी मनाचं आध्यात्मिक व बौद्धिक क्षितीज विस्तारायला हवं, पण त्याऐवजी स्वातंत्र्य हे माणसाचं शोषण करणारं साधन बनलं आहे. अप्रामाणिकता आणि भ्रष्टाचाराच्या घाणीत दर्जाची व संधीची समानता दबून गेली आहे. व्यक्तींची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकात्मता वृद्धिंगत करणारे बंधुता (Fraternity) हे तत्त्व म्हणजे केवळ प्रजासत्ताकदिनी मिरवायचे विचार झाले आहेत.’

कोणताही विचारी नागरिक या विवेचनाशी सहमत होईल.

व्यक्तिमात्राची प्रतिष्ठा, मानवी चारित्र्याची आंतरिक शक्ती व विवेकी मन म्हणेल तेच मान्य करून, त्यानुरूप कृती करण्याचे ध्येय व संकल्पच देशाला महान व कणखर बनवू शकेल!

आज आपला देश तसा आहे का? अर्थातच नाही.

त्यात इतर अनेकांप्रमाणे नोकरशाहीचाही महत्त्वाचा वाटा आहे. उच्च शिक्षण आणि दर्जेदार निरंतर प्रशिक्षणामुळे ‘अपडेटेड’ असणारी ब्युरोक्रसी (चांगले जीवनमान, अधिकार व प्रतिष्ठा मिळत असतानाही) आपले उत्तरदायित्व पुरेशा प्रमाणात निभावू शकली नाही. त्याचे कारण आहे तिची ब्रिटिश काळापासून चालत आलेली तटस्थता (न्यूट्रिलिटी) आणि कायमस्वरूपी सुरक्षा.

अमेरिकेच्या नोकरशाहीचे उदाहरण येथे विवेचनासाठी उपयुक्त ठरेल. तेथे ‘पोलिटिकल ब्युरोक्रसी’ असल्यामुळे राष्ट्राध्यक्ष त्यांच्या मर्जीने सचिव व इतर अधिकारी नेमू शकतात. त्यामुळे तेथील नोकशाही ही तटस्थ नसून, एका अर्थानं ती राजकीय आहे आणि मुख्य म्हणजे ती कायमस्वरूपी (पर्मनंट) नाही. त्याचे काही फायदे आहेत, तसे काही तोटेही. सर्वांत मोठा फायदा हा की, तेथे प्रत्येक चार वर्षांनी नव्या विचाराची माणसे, विविध विषयांचे तज्ज्ञ व नावाजलेले व्यावसायिक येऊ शकतात. तोटा म्हणाल तर, त्यांना राष्ट्राध्यक्षाच्या विचारांच्या व निर्देशाच्या चौकटीतच काम करावं लागतं.

याउलट भारतातील नोकरशाही ही कायमस्वरूपी व तटस्थ (न्यूट्रल) आहे. ती ब्रिटिशांनी विकसित केली असून कालानुरूप काही बदल सोडले तर, तिचा ब्रिटिशकालीन ढाचा कायम आहे. भारतीय नोकरशाही ही सत्तारूढ पक्षाशी नव्हे तर देशाच्या घटनेशी व कायदे-कानूनशी बांधील आहे. सरदार वल्लभभाई पटेलांनी आय.ए.एस.ची रचना करताना ती अपेक्षा बाळगली होती. आज काही प्रमाणात त्यामध्ये व्यक्तिसापेक्ष राजकीय रंग आला असला तरी ती बऱ्यापैकी तटस्थ आहे. प्रशासकीय अधिकाऱ्याने सत्तारूढ राजकीय नेत्याची ‘री’ ओढण्याचे नाकारले तर, शिक्षा म्हणून फार तर त्याची बदलीच होते, अन्य काही नाही.

सर्वसामान्यांपासून अंतर ठेवून अलिप्त वागणे व स्वत:ला अलग व श्रेष्ठ समजण्याची नोकरशाहीची ब्रिटिश काळापासूनची वर्चस्ववादी वृत्ती आजही कायम आहे. प्रशासक हे लोकसेवा संघ आयोगाची परीक्षा पास होऊन एकदा निवडले गेले की, वयाच्या साठ वर्षांपर्यंत काम कसेही करा, नोकरी व पगारपाण्याची (पदाच्या सुखसुविधेसह) हमी ठरलेली. त्यामुळे घटनेशी

बांधिलकीच्या नावाने आणि तटस्थपणाच्या आवरणाखाली नोकरशाही राजकीय नेतृत्वाला 'नाही' म्हणू शकते, प्रसंगी त्यांना गुंडाळूनही ठेवू शकते. घटना व कायद्याच्या पालनासाठी हा ताठ बाणा केव्हाही स्पृहणीय आहे, पण लोककल्याणकारी योजना राबवताना मात्र अशी तत्परता नोकरशाहीने मागील साठ वर्षांत दाखवलेली नाही. त्यांची तटस्थता ही वैयक्तिक पद, बदली व भ्रष्टाचाराच्या लुटीतील वाटा मिळवण्याच्या वेळी कापरासारखी विरघळून जाते, पार बासनात गुंडाळून ठेवली जाते.

भारतीय नोकरशाहीवरील सर्वांत मोठा आक्षेप कोणता असेल तर तो स्वार्थाचा – भ्रष्टाचाराचा. जेव्हा लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याखाली सापळा रचून उच्च दर्जाचे अधिकारी लाच घेताना सापडतात, (आज त्यांचे प्रमाण वाढलेले आहे.) तेव्हा जनमानसातील त्यांची ही प्रतिमा दृढ होत जाते. त्याचे नमुनेदार उदाहरण म्हणून डॉ.गौतम गोस्वामी या दिवंगत आय.ए.एस. अधिकाऱ्याचे देता येईल. गोस्वामी हे पाच वर्षांपूर्वी पटना या बिहारच्या राजधानीचे मुख्यालय असलेल्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी (कलेक्टर व डी.एम.) होते. बिहारमध्ये आलेल्या पुरामुळे तातडीने पूरग्रस्तांना मदत करण्यात त्यांनी उत्कृष्ट समन्वयाचे काम अविश्रांत केले, म्हणून 'टाइम' या जागतिक कीर्तीच्या साप्ताहिकाने आशियातील 'टॉप २०' प्रभावी व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश केला होता. २००८ चे बुकर पारितोषिक विजेते ('द व्हाईट टायगर' या इंग्रजी कादंबरीसाठी) लेखक अरविंद अडिगा हे तेव्हा 'टाइम'चे वार्ताहर होते व त्यांनीच डॉ.गौतम यांच्यावर फीचर लिहिलं होतं. पण पूरग्रस्तांसाठीची सुमारे अठरा कोटींची रक्कम डॉ.गौतम यांनी अस्तित्वात नसलेल्या खात्यावर वळवून भ्रष्टाचार केल्याचे उघडकीस आल्यावर त्यांना जेलमध्ये जावं लागलं आणि निलंबनाची मानहानी पत्करावी लागली. निसर्गाच्या प्रकोपानं ज्यांची घरंदारं उद्ध्वस्त झाली त्यांच्यासाठी शासनाने दिलेल्या रकमेचा अपहार करणं ही नोकरशाहीची बेपर्वाई व मुर्दाड संवेदनहीनता दर्शवित नाही का?

या उदाहरणाने उच्चपदस्थ नोकरशहांच्या भ्रष्टाचारावर व जनतेप्रत बांधिलकी न मानण्याच्या वाढत जाणाऱ्या प्रवृत्तीवर मला बोट ठेवायचं आहे. डॉ.गौतम हे ख्यातनाम प्रशासक असल्यामुळे त्यांचं उदाहरण विवेचनासाठी घेतलं एवढंच. (त्यांच्यापेक्षाही अधिक भ्रष्टाचार करणारे व जनतेप्रत बांधिलकी न पाळणारे अनेक नोकरशहा आहेत.)

भारतीय नोकरशाहीचे दोष व अपप्रवृत्ती प्रामुख्याने तीन प्रकारच्या आहेत.

१. भारतीय नोकशाहीची तटस्थता व घटनेप्रत असावयाची बांधिलकी मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे.

२. ज्यांच्या करातून आपला 'गलेलठ्ठ पगार' (सहाव्या वेतन आयोगानंतर आम्हांला मिळणाऱ्या पगाराला हा शब्द चपखल बसतो) होतो, त्या करदात्या भारतीय नागरिकांबद्दलची सामीलकी, तिच्या कल्याणासाठी राबवावयाच्या योजनांची स्वच्छपणे करावयाची अंमलबजावणी, मोहापायी आणि स्वत:च्या अधिकाराच्या अहंकारात भारतीय नोकरशाही मोठ्या प्रमाणात विसरली आहे.

३. उत्तम, भ्रष्टाचारविरहित प्रशासन, प्रभावी कायदा व सुव्यवस्था आणि जनहिताच्या निर्णयांची व योजनांची उद्देशांसह तंतोतंत अंमलबजावणी व नागरिकांना द्यावयाची फलप्राप्ती या तिन्ही आघाड्यांवर भारतीय नोकरशाहीने जनतेचा मोठ्या प्रमाणात अपेक्षाभंग केला आहे.

एकूणच भारतीय जनतेच्या अपेक्षाभंगाला येथील राजकीय नेतृत्वासह नोकरशाहीही समप्रमाणात जबाबदार असली तरी नोकरशाहीतील आय.ए.एस. व इतर संलग्न भारतीय प्रशासन अधिकाऱ्यांची जबाबदारी प्रामुख्याने जास्त आहे. कारण कोणताही विभाग असो – गृह, अर्थ, नियोजन, कृषी किंवा उद्योग, तेथे प्रामुख्याने सचिवपदी आय.ए.एस. अधिकारीच (९९ टक्के) आहेत. तेच राज्यकर्ते – मंत्री यांना धोरणे व योजना आखण्यात मदत करतात व सल्ला देतात. तेच शब्दांची कसरत करीत शासन निर्णय वा परिपत्रक जारी करतात. क्षेत्रीय स्तरावरील अंमलबजावणीचा पाठपुरावा, समीक्षा आणि समन्वय तेच साधत असतात. त्यामुळे त्या क्षेत्रातील विकास न होण्यास व अपयशास तेच प्रामुख्याने जबाबदार धरले जातात. हे असे कितीही दोष असले तरी प्रशासनाचा गाडा चालवण्यासाठी नोकरशाहीची गरज नाकारता येत नाही.

नोकरशाही ही केवळ राज्याची नसते, ती कंपनी, उद्योगसमूह, प्रतिष्ठाने व अगदी स्वयंसेवी संस्थांची (एन.जी.ओ.ची) पण असते. ती जितकी मोठी तितकी अकार्यक्षम असा अलिखित नियम आहे. तसेच तिला जितके जास्त अधिकार व जेवढी जास्त सुरक्षितता तेवढी बेपर्वाई व भ्रष्टाचार जास्त हेही ठरलेले. पण हे दोष असूनही ब्युरोक्रसीचा एक अपरिहार्य व आवश्यक गरज (नेसेसरी एव्हिल) म्हणून जगात सर्वत्र स्वीकार करण्यात आला आहे.

जगभर प्रशासकीय सुधारणांवर चर्चा, अभ्यास व विचारमंथन सातत्याने चालू असते आणि वेळोवेळी कालानुरूप त्यात सुधारणाही होत असतात. पण अनुभव हाच आहे की, या सुधारणा, मूळ जुनाट दुखणे कमी करीत नाहीत. त्या केवळ वरवरची मलमपट्टी करतात.

### नोकरशाही असे का वागते?

त्याचे प्रथमदर्शनी कारण म्हणजे तिची विशिष्ट रचना व तिला मिळालेले अंमलबजावणीचे अमर्याद अधिकार. दहा–बारा हजार वेतन घेणारा एक तलाठी पन्नास लाखांच्या जमिनीची खोटी नोंद घेऊन श्रीमंत जमीन मालकाला देशोधडीस लावू शकतो. एक कारखाना निरीक्षक एखादा चोवीस तास चालणारा कारखाना एखाद्या क्षुल्लक बाबीची पूर्तता झाली नाही म्हणून महिना–महिना बंद करू शकतो व कोट्यवधींचं नुकसान करू शकतो. म्हणजे कार्यक्षम प्रशासनासाठी दिलेले अफाट अधिकार वापरण्यासाठी विवेक व तत्त्वनिष्ठा लागते, ती आज कितीशी शिल्लक आहे?

दुसरे कारण म्हणजे, विसाव्या शतकात अमर्यादित उपभोगाची वाढत चाललेली सामाजिक अपप्रवृत्ती. जास्तीत जास्त

[पृष्ठ १७ वर

**सिनेमातलं जग आणि जगातला सिनेमा**

**सुषमा दातार**

# चित्रपट हे नव्या दमाचं, नव्या जगातलं सशक्त माध्यम आहे!

सध्या मराठी चित्रपटांना आणि चित्रपटविषयक लिखाणालाही खूपच बरे दिवस आले आहेत. उदंड निर्मिती होते आहे. तुम्ही वर्तमानपत्रातल्या सिनेमांच्या जाहिरातींचं पान आणि पुस्तक परीक्षणं नियमित बघत असाल तर तुमच्या लक्षात आलंच असेल. अशा सुगीच्या दिवसांत निर्मितीचा दर्जा संख्येबरोबर ओघानं चांगलाच घडतो असं मात्र होत नाही. जगभरातल्या चित्रपटांचा इतिहास हेच सांगेल-दाखवेल आपल्याला. दर्जेदार निर्मितीसाठी खास प्रयत्न व्हावे लागतात. तसे ते इतिहासाच्या विविध टप्प्यांवर विविध राजकीय-सामाजिक परिस्थितीमध्ये झालेले दिसतातही. हे निर्माते-दिग्दर्शक यांच्याकडून झालेले दिसतात तसे क्वचित राज्यकर्त्यांच्या प्रोत्साहनातूनही झालेले दिसतात. तसेच अभ्यासक, समीक्षक, चित्रपटविषयक शिक्षण देणारे शिक्षक, फिल्मक्लब, फिल्म फेस्टिव्हल यांच्याकडूनही झालेले दिसतात. या सगळ्या प्रयत्नांमुळे घडतो चोखंदळ, रसिक, जाणकार प्रेक्षक. (शिवाय खिशात बऱ्यापैकी पैसा असलेला, असंही आता मल्टिप्लेक्सच्या जमान्यात म्हणावं लागेल.)

असा प्रेक्षक घडत रहायचा असेल तर त्यासाठीचे प्रयत्न मात्र सातत्यानं करत रहावे लागतील. कारण काळ बदलेल तशी निर्मिती बदलेल आणि तसा प्रेक्षकही बदलायला हवाच. चित्रपटनिर्मिती आणि चित्रपट पाहणं हे दोन्हीही तंत्रज्ञानावर अवलंबून असल्यामुळे दोन्हीही फुकट घडत नाही. अगदी सुरुवातीपासून आत्तापर्यंत, माणसांचं चित्रपटांशी असलेलं नातं पैशावर अवलंबूनच राहिलेलं आहे. अगदी उच्च कलात्मक पातळीवरची निर्मिती असली तरीही. तेव्हा तंत्रज्ञानात आणि निर्मिती-वितरण प्रक्रियेत बदल होत असताना, मराठी चित्रपटांचंही मार्केटिंग आक्रमक पद्धतीनं व्हायला लागलेलं असताना आपल्याला चित्रपटांचे फक्त प्रवाहपतित-ग्राहक रहायचं आहे का? हा प्रश्न आपण आपल्यालाच विचारूया. रसिक, विचारी प्रेक्षक-ग्राहक व्हायचं असेल तर चित्रपटविषयक वैचारिक समजावून घेण्याविषयी लिखाण करतात, तसे चित्रपटप्रेमी लोक आपल्याला आवडलेल्या चित्रपटांच्या कथांविषयी, अभिनेत्यांविषयी, दिग्दर्शकांविषयी उत्कट भावनिक पातळीवरूनही लिहितात. सतत विविध प्रकारच्या चित्रपटांच्या शोधात राहून, ते पाहून त्याबद्दल लिहिणारेही असतात. इंटरनेटवर तर तज्ज्ञ आणि सर्वसामान्य प्रेक्षकांनी केलेल्या

**अगदी डोकं बाजूला काढून ठेवा म्हणणाऱ्या चित्रपटातही काही छानसं टिपता यायला लागतं. तसंच भूतकाळातल्या महान समजल्या जाणाऱ्या चित्रपटांकडेही केवळ ते 'आपले' म्हणून 'महान' अशा रंगाच्या चष्म्यातून बघणं कमी होत जातं. अशा स्वानुभवाचा आणि बाल, तरुण, प्रौढ प्रेक्षकांशी एक शिक्षक म्हणून होणाऱ्या संवादाचा आधार घेऊन सिनेमाच्या जगाची सैर साधनाच्या वाचकांबरोबर करावी या हेतूनं ही मासिक-लेखमाला सुरू करायचं धाडस करते आहे.**

लेखनाची मदत नक्कीच होईल. तसे प्रयत्न पूर्वी 'साधना'नंही केलेले आहेतच. चित्रपट रसग्रहणाची छोटी छोटी शिबिरंही आता घेतली जात आहेत. त्याला प्रतिसादही चांगला मिळतो आहे. अशा तऱ्हेनं स्वत:हून अधिक सुजाण होऊ पाहणाऱ्या प्रेक्षकाला चित्रपटविषयक लेखनाबद्दल ('पेज थ्री'वरचं फिल्मी लिखाण नव्हे) उत्सुकता आहे. अशा उत्सुक वाचकाला काय काय उपलब्ध आहे बरं?

चित्रपट ही एक यंत्राधिष्ठित कला आहे असं मानून अभ्यास करणारे, चित्रपटकला चित्रपटविषयक लिखाणाचा खजिनाच सापडतो. रिव्ह्यू किंवा ब्लॉग स्वरूपात. जितक्या परीचे चित्रपट तितक्या लेखकांच्या परी. सुजाण प्रेक्षक घडविण्याच्या प्रक्रियेत या सगळ्यांचाच सहभाग असायला हवा. पण सुजाणतेच्या घडणीचा प्रत्यक्ष प्रयत्न मात्र आपला आपल्यालाच करावा लागेल. जे आवडतं किंवा आवडत नाही ते कशामुळे? जे समजलं नाही ते समजावून घेता येईल का? एखाद्या चित्रपटाचा माझ्यावर वैचारिक, भावनिक प्रभाव पडला का? तसा तो कशामुळे पडला? जे काही

समजलं, वाटलं त्याला चित्रपटाच्या रचनेत काही आधार आहे का? असे काही प्रश्न त्यासाठी उपयोगी ठरतील. आपण शाळेत आपल्याला कळलेल्या कवितेचं रसग्रहण करायला शिकतोच ना, मग तसंच चित्रपटांबद्दल शिकायला काय हरकत आहे? खरं तर नकळत आपण शिकतच असतो. पण अधिक जाणीवपूर्वक शिकण्यासाठी मात्र तज्ज्ञांची मदत घेतली तर ते शिकणं आनंददायी ठरतं. पुस्तक-गप्पा असतात तशा चित्रपट-गप्पाही उपयोगी पडतात.

सर्वसामान्य प्रेक्षक ते अधिक डोळस प्रेक्षक हा माझा प्रवास मला स्वत:लाच फार रंजक आणि उद्‌बोधक वाटत आलेला आहे. या प्रवासात माझे समजून घेण्याचे प्रयत्न जसे महत्त्वाचे आहेत तसं विविध प्रकारचे चित्रपट पाहण्याची संधी मिळणं हेही महत्त्वाचं आहे. आपल्या इथल्या आणि जगातल्या अनेक बऱ्या-वाईट, उत्तम चित्रपटांची ओळख होताना जो नीरक्षीर विवेक विकसित होत जातो ना, तो व्यावहारिक जीवनातही अनेक प्रकारच्या अनुभवांना भिडताना, माहितीच्या प्रचंड ओघाला तोंड देताना उपयोगी पडतो. 'चित्रपट म्हणजे आपली उगीच दोन घटका करमणूक, एवढा काय त्याचा विचार करताय' असं ते रहात नाही मग. अगदी डोकं बाजूला काढून ठेवा म्हणणाऱ्या चित्रपटातही काही छानसं टिपता यायला लागतं. तसंच भूतकाळातल्या महान समजल्या जाणाऱ्या चित्रपटांकडेही केवळ ते 'आपले' म्हणून 'महान' अशा रंगाच्या चष्म्यातून बघणं कमी होत जातं. अशा स्वानुभवाचा आणि बाल, तरुण, प्रौढ प्रेक्षकांशी एक शिक्षक म्हणून होणाऱ्या संवादाचा आधार घेऊन सिनेमाच्या जगाची सैर साधनाच्या वाचकांबरोबर करावी या हेतूनं ही मासिक-लेखमाला सुरू करायचं धाडस करते आहे. त्याला आणखी एक कारणही आहे.

सध्या पुण्या-मुंबईकडच्या प्रेक्षकांना तरी चित्रपट महोत्सवाच्या निमित्तानं खूप चित्रपट बघायला मिळताहेत. अशा ठिकाणी चित्रपटासाठी रांग लावून उभं असताना लोक जे बोलतात त्याकडे लक्ष दिल्यावर प्रेक्षकांच्याही अनेक परी सापडतात. खूप सारे चित्रपट पाहिले... विशेषत: कलात्मक म्हणजे आपल्याला तज्ज्ञतेनं कुठल्याही चित्रपटावर काहीही बोलता येतं असा फाजील आत्मविश्वास बाळगणारे आढळतात. काही न कळलेली मंडळी अतिशय नम्रतेनं जाणून घ्यायचा प्रयत्नही करताना दिसतात. ही दोन प्रकारची मंडळी एकमेकांशी बोलली तर काय काय होतं तेही कानावर पडतं. चित्रपटांना आपापली वैयक्तिक प्रतिक्रिया देण्याचा हक्क प्रत्येकाला आहेच. परंतु या माध्यमाची आणि चित्रपटांच्या विविध प्रकारांची जवळून ओळख करून न घेता आपल्या हक्काचीच अंमलबजावणी करत राहिलो तर मनापासून चित्रनिर्मिती करणाऱ्यावर आपण अन्याय करतो असं होईल. तसंच आपल्याला अतिशय आवडू शकणाऱ्या चित्रपटांकडे पूर्वग्रहामुळे पाठ फिरवली असंही होईल. आनंददायी अनुभवापासून वंचित राहिलो किंवा मानवी जीवनाच्या नव्या पैलूंची ओळख करून घेण्याची संधी दवडून बसलो असंही होईल. म्हणूनच आपल्या प्रेक्षकपणाची घडण होतेय का हे बघणं महत्त्वाचं आहे. कारण कथा-कादंबऱ्यांतून, चरित्र-आत्मचरित्रांतून पोचतं तसंच वैविध्यपूर्ण मानवी जीवनाचं वैविध्यपूर्ण चित्रण चित्रपटांतूनही आपल्यापर्यंत पोचतं. या माध्यमाला वाचनाच्या तुलनेत सतत कमी लेखण्याचं आपण जितकं लवकर थांबवू तितकं पुढच्या पिढीच्या दृष्टीनं बरं पडेल.

लहानपणी आम्हा मुलांना जे चित्रपट दाखवले जात आणि आवडत ते आताच्या मुलांना दाखवले तर त्यांच्या प्रचंड वेगळ्या, स्पष्ट प्रतिक्रिया येतात. उदाहरणार्थ, 'देवबाप्पा'. आता वाटतं तो मुलांचा चित्रपट म्हणून का दाखवला जायचा? लहान मुलगी मुख्य पात्र म्हणून? नाचरे मोरा हे गाणं आहे म्हणून? आताची मुलं हे प्रश्न स्पष्ट विचारतीलही, पण तशा वेगळ्या प्रतिक्रिया माझ्या वयाच्या मुलांनी स्पष्टपणे दिलेल्या मला आठवत नाहीत. तेव्हाच्या हिंदविजय थेटरात रविवारी सकाळी मुलांचे चित्रपट दाखवत. त्यात 'श्यामची आई' होता. 'युकीवारीसू' अशा काही नावाचा चित्रपट पाहिल्याचं आणि आवडल्याचं आठवतं. इतरही परक्या संस्कृतीतले चित्रपट असायचे. त्यातले जाड्या रड्या आणि काही तत्सम चित्रपट पुसटसे आठवतात. पण हा प्रयोग अल्पजीवीच ठरला. बाकी मग पठडीतलं. आईवडिलांना आवडणाऱ्या म्हणजे मराठी कौटुंबिक, सामाजिक वगैरे चित्रपटांना त्यांच्या बरोबर जाणं आणि जे जमेल ते समजून घेणं याला फारसा पर्याय नव्हता. कोणते चित्रपट पहावे? असा प्रश्न विचारण्याइतकी व्हरायटीही उपलब्ध नव्हती. मुलगी असल्यामुळे भलत्याच थेटरात जाता येतं असली काही जाण असण्याची शक्यताही नव्हती. त्यामुळे 'चित्रपट कसा बघावा?' असा प्रश्न पडण्याचा प्रश्नच नव्हता. तारुण्यात प्रवेश करेपर्यंत ही परिस्थिती बदलली. हिंदी चित्रपटांचं जग ओळखीचं झालं. इंग्रजी चित्रपटांचं अस्तित्व जाणवू लागलं. त्यातलं काय बघायचं हे ठरवण्याचं मर्यादित स्वातंत्र्य (अर्थातच वेळेची, पैशाची मर्यादा) मिळालं. तरीही आपणहून ॲडल्ट चित्रपटांना जाण्याचं धाडस नव्हतं. वडिलांनीच आपणहून एका ॲडल्ट - विज्ञान काल्पनिकेला नेल्याची आठवण मात्र आहे. हे असलं अचंबित करणारं काही

**आपल्या चित्रपटांचे आपणच रसिक-चिकित्सक प्रेक्षक झालो तर वेगळ्या संस्कृतीतल्या वेगळ्या चित्रपटांचा आस्वाद घेणं अधिक सोपं जाईल. जागतिकीकरणाच्या लाटेत अशी सांस्कृतिक देवाणघेवाण व्हायलाच हवी आहे. सहिष्णुवृत्तीच्या वाढीसाठी ते आवश्यक आहे आणि चित्रपट हे त्यासाठीचं नव्या दमाचं, नव्या जगातलं सशक्त माध्यम आहे.**

आपल्याला पुन्हा पहायला मिळेल का नाही कुणास ठाऊक अशा मूडमध्येच तो चित्रपट पाहिल्याचं आठवतं. मग पठडीतले प्रेम कहाण्यांचे हिंदी चित्रपट आवडण्याची दोन तीन वर्षं गेली आणि मॅटिनीला गुरुदत्त सापडला. पुढे फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये फिल्म क्लब सुरू झाला. तिथे चुकून कुणाबरोबर गेस्ट म्हणून जाऊन एखादा फ्रेंच चित्रपट पहायला मिळाला. पण... वो उस टाईममे हमारे बसकी बात नही थी.

मग अगदी वेगळेच श्याम बेनेगलांचे चित्रपट आले. क्लोजअपमध्ये तळागाळातल्यांचं दु:ख दाखवणारे. त्या गोष्टींना 'आवडल्या' असं म्हणायची सुद्धा भीती वाटली होती तेव्हा. मराठीत असं काही पाहिलेलंच नव्हतं. अशा धक्का देणाऱ्या 'अंकूर, आक्रोश' बरोबरच बासू चटर्जी आणि बासू भट्टाचार्यही आले. एखादा 'रायन्स डॉटर' किंवा 'सनफ्लॉवर' एकूण काय... तर काय बघायचं याची निवड आपल्या हातात असते इथपर्यंत समजेची मजल गेली. मग बऱ्याच मोठ्या वयात या सवयीच्या चित्रपटांपेक्षा वेगळे चित्रपट पाहिलेल्यांशी संपर्क आला. माझ्या सवयीच्या चित्रपटांना त्यांचे येणारे वेगळे प्रतिसाद समजायला लागले आणि 'चित्रपट कसा बघावा?' हा प्रश्न विचारता येतो इथपर्यंत मजल गेली. माझ्या गुरू-मैत्रिण श्यामला वनारसे यांना प्रश्न विचारून भंडावणं वगैरे. मग अशा सगळ्यांचं होतं तेच. चित्रपट रसग्रहणाचा फिल्म इन्स्टिट्यूटचा कोर्स करणं. सतीश बहादूर या अफलातून चित्रपट-शिक्षकाच्या शिकविण्याचा अनुभव घेणं ओघानंच आलं.

आताच्या मुलांना हाच प्रश्न विचारला तर काय होईल? तल्लख विनोदबुद्धी असलेले आणि बालपणापासून चित्रपट पहात आलेले काही तरुण-तरुणी लगेच म्हणतील 'थेटरात खुर्चीत बसून बघावा, नाहीतर घरात कोचावर पाय पसरून डीव्हीडी प्लेअरवर बघावा. होम थिएटर असेल तर तसाही बघावा. लॅपटॉप सहित लोळत यू ट्यूबवर बघावा. तेही जमलं नाही तर अगदी जत्रेतल्या तंबूत किंवा व्हीडिओ-पार्लरमध्ये व्हीडिओ प्रोजेक्टरवरून भिंतीवरसुद्धा बघावा ना. इतक्या गोष्टींचे 'विषय' झालेत आता, पिक्चर बघायचा विषय करू नका बुवा. लेट अस एन्जॉय देम.' काय ही धिटाई! या टिपिकल प्रतिसादातून बाहेर आलो तर काही वेगळं दिसेल. यातला त्यांच्या नाराजीचा आणि उपरोधाचा भाग सोडला तर आपल्याला चित्रपटाच्या प्रेक्षकांमध्ये होत गेलेले बदलच दिसतील या त्यांच्या वक्तव्यातून. आज आपल्याला चित्रपट बघण्यासाठी साधनांचा इतका मोठा चॉईस आहे. मग त्यामुळे आपल्या आस्वाद घेण्याच्या पद्धतीवरही परिणाम होत असेल ना! त्याकडे बघूया.

सुरुवातीच्या चित्रपटांतील हालत्या प्रतिमा म्हणजे अचंबित करणारी गोष्ट होती. चित्रपटातील आगगाडी अंगावर येईल अशी भीती वाटण्याचे दिवस होते. तसंच चित्रपटातल्या संत तुकारामांना किंवा श्रीरामाला खरं मानून वंदन करण्याएवढीच समज होती. चित्रपट माध्यम जसं विकसित होत गेलं तसा प्रेक्षक विकसित होत गेला. चित्रपट समजण्यासाठी साक्षरतेसारखं विशेष कौशल्य आत्मसात करण्याची गरज नव्हती. त्यामुळे जीवनाचं हुबेहूब चित्रण प्रेक्षकांना समजायला सोपं वाटत होतं. पाहून पाहून ते जमत होतं. पण एक गोष्ट मात्र बदलली नव्हती. ती म्हणजे कसल्या का होईना थेटरात अंधारातच बसून, मोठ्या पडद्यावर प्रेक्षक सिनेमा पहात असत आणि त्यांनी ते तसे बघावेत म्हणूनच ते तयार केलेले असत. आता मात्र चित्र बदललं आहे. थेटरात पाहण्यासाठी तयार केलेले चित्रपट आपण छोट्या, मध्यम, मोठ्या, आडव्या, चौकोनी कसल्या कसल्या पडद्यांवर अंधारात, अर्ध अंधारात, उजेडात, घरात, लहान हॉल्समध्ये, क्लबात कुठेही कसेही, केव्हाही बघतो. मध्येच जेवतो, आवाजी प्रतिक्रिया देतो, फोन घेतो आणि तरीही मोठ्या तज्ज्ञतेनं अशा तऱ्हेनं पाहिलेल्या चित्रपटावर बोलतोही. आपल्या प्रेक्षक म्हणून होणाऱ्या घडणीतला हा महत्त्वाचा भाग. चित्रपट कसा बघावा? या प्रश्नाकडे 'चित्रपट समजून कसा घ्यावा?' या अर्थानं बघायच्या आधी शब्दश: अर्थ घेऊन पाहणंही तितकंच गरजेचं आहे. कारण आपण कसे, किती गांभीर्यानं किंवा आनंदानं रंगून चित्रपट पाहतो किंवा पहात नाही यावर आपली चित्रपटविषयक समजूत अवलंबून असणारच आहे. हे लक्षात घेतल्यावर चित्रपटाचा रंजन म्हणून आणि माहिती, विचारांच्या आदानप्रदानाचं साधन म्हणूनही आपल्याला अधिक चांगला उपयोग करून घेता येईल. कलेचा व्यवसाय होतो तेव्हा असं ग्राहक प्रशिक्षणही आवश्यक असतंच ना!

आता परत आपल्या मराठी चित्रपटांच्या लाटेकडे वळू. सध्याच्या भाषाभिमानाच्या लाटेवर स्वार होऊन केवळ 'आपले' म्हणून कौतुकानं या बक्कळ निर्मितीकडे पहात गेलो तर या दर्जा राखण्याच्या कामात आपला प्रेक्षक म्हणून हातभार लागणं अवघड आहे. आपला 'श्वास' ऑस्करवारीला गेला किंवा इतर काही चित्रपटांना परदेशी महोत्सवात पुरस्कार मिळाले याचं कौतुक आहेच; परंतु तेवढंच करत न बसता जरा विचार करूया. त्याच वेळी आपल्यासारखीच परिस्थिती असणाऱ्या देशांत आणि प्रगत देशांतही कसले चित्रपट बनले? ते आपल्याला पाहता आले तर पाहूया. ज्यांनी ते पाहिले त्यांना या कौतुकवाल्या चित्रपटांबद्दल काय म्हणायचंय तेही पाहूया. कारण आपल्या चित्रपटांचे आपणच रसिक-चिकित्सक प्रेक्षक झालो तर वेगळ्या संस्कृतीतल्या वेगळ्या चित्रपटांचा आस्वाद घेणं अधिक सोपं जाईल. जागतिकीकरणाच्या लाटेत अशी सांस्कृतिक देवाणघेवाण व्हायलाच हवी आहे. सहिष्णुवृत्तीच्या वाढीसाठी ते आवश्यक आहे आणि चित्रपट हे त्यासाठीचं नव्या दमाचं, नव्या जगातलं सशक्त माध्यम आहे. मग समजून घेऊया? सिनेमातलं जग आणि जगातला सिनेमा.

**– सुषमा दातार**
१०६ /८, एरंडवणे, मकरंद अपार्टमेंट,
पुणे ४११००४.
दूरध्वनी : ०२०-२५४३२५८०.

(सुषमा दातार यांचं 'सिनेमातलं जग आणि जगातला सिनेमा' हे सदर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या अंकात प्रसिद्ध होईल.
– संपादक)



राजा शिरगुप्पे

न पेटलेले दिवे

# इरफान

ऊन, पाऊस, थंडी, या तिन्ही ऋतूंचा दररोजच अनुभव घेत इरफान गावच्या मुख्य बसस्थानकावर सकाळी ५ पासून सायंकाळी ५ वाजेपर्यंत वर्तमानपत्रे विकतो. हातातल्या भल्या मोठ्या तागाच्या पिशवीतील शेवटचे वर्तमानपत्र संपल्यावरच तो स्टँडचे आवार सोडतो. मला कौतुक वाटतं ते की, सकाळी येणारे वृत्तपत्र सूर्य माथ्यावर यायच्या आधीच गिऱ्हाईकाच्या दृष्टीने शिळे झालेले असताना, थेट संध्याकाळीदेखील 'ताजे' म्हणून विकू शकतो या त्याच्या विक्री कौशल्याचं. आणि संध्याकाळी ५ वाजता ते वृत्तपत्र विकत घेऊन वाचणारा वाचकही केवळ 'वाचन संस्कृती' जोपासणाऱ्या वाचन चळवळीचा खंदा समर्थकच असणार!

**मदरशाच्या ओसरीतच इरफान बसला होता. मला पाहताच लगबगीनं जवळ आला. डोळे पाण्याने भरले होते. माझा हात पकडून म्हणाला, 'सर, अब मालूम हुआ, गलत लोग गलत किताबे क्यूं लिखते है. अबसे मै पैसा मिलता है करके 'सनातन प्रभात नही बेचूंगा!'.**

माझ्या भटकंतीमुळे जवळपास दररोजच मी कुठल्या तरी गावाला जाण्यासाठी स्टँडवर असतो. इरफानचं मी हक्काचं गिऱ्हाईक. त्यामुळे एक-दोन दिवस जरी मी स्टँडवर दिसलो नाही, तरी इरफान अस्वस्थ होतो. मग भेटला की लगेच या एक-दोन दिवसांचे 'बरेच प्रश्न' होतात आणि 'सर, बरेच दिवस दिसला नाहीत, कुठे दौऱ्यावर होता का?' असा प्रश्न. इरफानच्या या नियमित प्रश्नाला एकदा मी वैतागून कृतकक्कोपाने म्हटलं,

'दौरे करायला मी काय पुढारी आहे, इरफान?'

'पण लेखक हाईसाच की!'

मी लेखक आहे, हे तुला कसं कळलं?' माझा चकित प्रश्न.

'त्याशिवाय काय तुम्ही इतकं वाचता?'

'पण मी खूप वाचतो म्हणून तुला कुणी सांगितलं?' मी बऱ्यापैकी गोंधळात.

'मग या पिशवीत एवढी पुस्तकं घेऊन कशाला फिरता?'

अस्सं आहे तर! म्हणजे लेखक केवळ त्याच्या लेखनावरून ठरतो, असा जो माझा समज होता, तो इरफाननं क्षणात पुसून काढला. वाचण्यावरूनही लेखकपणाची ओळख होऊ शकते, असा एक नवा सिद्धांत इरफानमुळे मला समजला.

'मग मी तुला पुस्तक विक्रेता का वाटलो नाही?' मलाही थोडी चेष्टेची लहर आलेली.

'पुस्तकविक्रेता अशी रद्दी पुस्तके घेऊन फिरत नाही.' इरफान अत्यंत भाबड्या गंभीरतेने माझी दांडी उडवतो. पुस्तकांना कान नसतात, हे बरंय! नाहीतर माझ्या शबनममधल्या अर्नेस्ट हेमिंग्वेने पुन्हा एकदा खचितच आत्महत्या केली असती. पुढं काहीच न बोलता मी पेपरचे पैसे इरफानच्या हातात ठेवले आणि पेपर उघडून माझा खजिल चेहरा दडवण्याच्या मिषाने त्यात घुसवला.

इरफानशी अशा होत जाणाऱ्या संवादातून त्याच्याशी माझी दोस्ती घट्ट होत गेली. एकमेकाला चहा ऑफर करण्यापर्यंत आमची मैत्री वृद्धींगत झाली. एस.टी. कँटीनमध्ये

चहा घेताना एकदा मी त्याला सहज विचारल्यासारखं विचारलं,

'किती वर्षे झाली, पेपर विकतोस?'

'चार-पाच वर्षे तरी झाली असतील.'

'वय काय आता तुझं?'

'आसंल की पंधरा.' इरफान लाजत म्हणाला. ओठावर कोवळी लव दिसू लागलीच होती.

'शिक्षण किती झालंय?'

'पाचवीच्या मध्यातच शाळा सोडली सर.' यावेळी इरफानची नजर जरा खाली झुकलेली. स्वरांत थोडासा अपराधीपणाचा भाव. मग मी पुढं काही विचारायच्या आधी स्वत:च सांगू लागला, 'म्हणजे, माझं गाव हे न्हवं. मी हुपरीकडं, तिकडं कर्नाटकात चांदशिरदवाड गाव हाय न्हवं का, तिथला. मी लई लहान असतानाच अब्बा वारला. मग अम्मी मला आणि माझ्या थोरल्या भनीला घेऊन हितं मामाकडं आली. मी पाचवीला गेलो, तवा कायतरी खोकंचा आजारा होऊन अम्मी अल्लाला प्यारी झाली. मग मामू म्हणाला, 'शाळा शिक, पण कायतरी कामधंदा पण कर.' त्येनंच या वाळके पेपरवाल्याकडं पेपर इकायला ठेवलं. या कामातनं शाळंला येळ कायी मिळंना. तवा ऱ्हायली ती ऱ्हायलीच.' मग गडबडीनं एकदम उठून 'सर, एस.टी. आली. बगतो कोण गिऱ्हाईक गावतंय का?' म्हणत फलाटाच्या दिशेने धावला.

अशा अधूनमधून होणाऱ्या गप्पातून इरफानचं पूर्वायुष्य मला उलगडत होतं. त्याचा बाप कर्नाटकातल्या त्याच्या गावच्या पंचक्रोशीत गवंडी काम करायचा. एक पडकं घर आणि पंधरा गुंठे जमिनीवर बाप आणि त्याचे तीन सावत्रभाऊ बायका-पोरांसह गुजराण करत होते. इरफान एक वर्षाचा होता तेव्हा त्याचा बाप कुठल्याशा घराचं बांधकाम करताना भिंत कोसळून तिच्यात गाडला गेला. मग बाकीचे 'चाचे' अम्मीला त्रास देऊ लागले, म्हणून इरफानचा मामू बहिणीला आणि भाचरांना घेऊन इकडं आजोळात आला. इथंही इरफानची अम्मी त्याच्या समाजातल्या शेठ लोकांकडे धुणी-भांडी करून स्वत:चा आणि भावाचाही संसार चालवायची. मामू काहीच कामधंदा करायचा नाही. आताही करीत नाही. नुसतं बिड्या फुंकत गावातल्या मशिदीबाहेरच्या कट्ट्यावर 'गपशप लडवत' बसतो. इरफान चार-पाच वर्षांचा झाला, तसं त्याच्या अम्मीनं समाजातल्याच एका श्रीमंताच्या सांगण्यावरून त्याला कोल्हापूरच्या मदरशात ठेवलं. तेवढंच घरातलं एक 'खानेवाला मूँह' कमी.



मदरशात एकूण सात वर्ग. त्यानुसार अभ्यासक्रम वाढत जायचा. पहिल्या वर्गाला अरबी भाषा, कुराण पाठांतर, थोडंसं गणित आणि तवारिख-ए-हिंद म्हणजे भारताचा इतिहास एवढे विषय शिकवले जात. शिकवायला बहुतेक यु.पी.-बिहारकडलेच मौलाना होते. इकडल्या भागातील एक-दोघे होते, पण ते याच मदरशात शिकून नंतर इथेच 'जनाब' झालेत. कुराण पाठांतर घेणारे मौलाना खूपच कडक. कलमा पाठ झाला नाही तर अंगठे धरून पाठीवर कुराण ठेवून कलमा पाठ करून घ्यायचे. तोपर्यंत जेवणसुद्धा द्यायचे नाहीत. पाठांतराचा अर्थ कळायचा नाहीच, मग बिनचूक म्हणतोय की नाही हे तरी कसं कळणार? पण इतिहास शिकताना मात्र बरं वाटायचं. जनाब इथलेच. कोल्हापूरचे होते. गोष्ट सांगितल्यासारखे इतिहास शिकवायचे.

ते शाहू महाराजांच्या, शिवाजी महाराजांच्या खूप गोष्टी सांगायचे. 'इतिहास ध्यानसे पढो, क्योंकि किताबें गलत तरीकेसे, गलत लोगोंने लिखी है।' असं काहीबाही सांगायचे. हे सांगताना इरफान मधेच एकदम थांबला. माझ्याकडे तीव्र नजरेने पहात म्हणाला, 'सर, गलत लोग किताबे लिखते है? और लिखते है तो क्यो लिखते है?' इरफानच्या या प्रश्नाला त्यावेळी तरी मला उत्तर द्यायचं धाडस झालं नाही.

सकाळी ४ पासून रात्री ११ पर्यंत शिकणं आणि शिकवणं, इरफानच्या शब्दात 'रटरट' चालायची. सोबत पाठांतराच्या वैतागामुळे जनाबजींच्या शिक्षेचा दौर. ईदच्या सुट्टीला आलेला इरफान मग पुन्हा मदरशात गेलाच नाही. 'मुझे वो रटरट अच्छी नही लगती.' सांगत त्यानं अम्मीजवळ मदरशात जायचं ठाम निकरानं नाकारलं. मग अम्मीनं त्याला इथल्याच जिल्हा परिषदेच्या मराठी प्राथमिक शाळेत पहिलीत नेवून बसवलं.

तो मदरशातून आलेला मुलगा आहे. हे कळल्यावर त्याचे वर्गशिक्षक त्याला थेट 'तालिबानी' म्हणूनच हाक मारायचे... अधूनमधून कुत्सितपणे विचारायचे, 'क्या उधर भारत के खिलाफ कुछ

सिखकर आया है की नही? बॉम्ब वगैरे बनवाने को सिखाया है की नही?' बाकीची पोरं फिदीफिदी हसायची. सरांच्या या बोलण्यापेक्षा इरफानला या वर्गसाथींच्या हसण्याची लाज वाटायची आणि रागही यायचा. पोरंही त्याला कधीकधी भांडणात 'लादेन की औलाद' आणि एरवी 'लांड्याऽऽ लांड्या' म्हणून चिडवायची. अम्मीला सांगितलं तर अम्मी उलट इरफानलाच डाफरायची. 'मुसलमानोंको बाकी सब लोग ऐसाच बोलते है. आपून ध्यान देने का नही. चूपचाप पढाई करते सो रहना.' वर्गात नेहमीच मुसलमान मुलं शेवटच्या रांगेत बसायची. सरही आमचा अभ्यास कधी तपासायचे नाहीत. किंवा केलाय की नाही विचारायचे नाहीत. कधी उत्तर सांगायला एखाद्या मुसलमान मुलानं बोट वर केलं तर दुर्लक्ष करायचे किंवा अशा काही नजरेनं बघायचे की पुन्हा त्यानं बोट वर करायचं धाडस करू नये.

सातवीपर्यंत नापास करायचं नाही, या शैक्षणिक धोरणामुळं इरफान पाचवीपर्यंत कसा पोहोचला, ते इरफानलाही कळलं नाही. मग टी.बी.नं त्याची आई वारली, तेव्हा त्याच्या खुशालचेंडू मामानं त्याला वाळके पेपर एजंटकडे प्रतीपेपर चार आणे कमिशनवर सोपवला. दररोज पंचवीस रुपये तरी मजुरी पडावी म्हणून इरफान त्यावेळी जो बसस्थानकाच्या आवारात आला तो आजतागायत त्या आवारातून बाहेर पडू शकलेला नाही. शाळेची वाट तर केव्हाच विस्मरणात गेलेली.

'सर, फक्त एक रुपया. आज ह्यो नवा पेपर घ्या.' इरफाननं 'सनातन प्रभात'चा अंक माझ्या हातात ठेवला आणि मी उडालोच!

'हा पेपर?... तू विकतोस?' मी थोडासा भांबावत... थोडासा सावरत त्याला प्रश्न केला.

'का? बाकीच्या पेपरना मला चार आने कमिशन हाय. या पेपराला आठ आने. सकाळपास्नं पन्नास अंक खपिवलं मी.' इरफानच्या चेहऱ्यावर विक्रेत्याचा गर्व दिसत होता.

'अरे पण, या पेपरात सगळं तुमच्या विरुद्ध... म्हणजे मुसलमानांविरुद्ध लिहिलेलं असतं.'

'मग काय झालं? प्रत्येक पेपरात कुनाच्या तरी इरुद्धच लिवलेलं आसतं की! उलट सगळे पेपर इकून मला जेवढे पैसे रोज मिळतात, तेवढे आज या एका पेपरमुळे मिळाले.'

इरफानच्या या व्यावसायिक शहाणपणापुढे मी काय बोलणार?

इरफानच्या बरोबरीनं आता आणखीही काही पेपर विक्रेते बसस्टँडच्या आवारात दिसू लागले आहेत. कधी कधी इरफान त्याच्या 'धंद्यात' वाढत चाललेल्या या स्पर्धेबद्दल त्रागा व्यक्त करतो. पण आपण सहानुभूती व्यक्त करण्याच्या आधीच म्हणून मोकळा होतो, 'नशीबातलं कोन काढून घेणार हाय का सर? अल्ला सबको रोटी देता है.' अनाथ इरफानमध्ये हा विश्वास मदरशातून आला की प्रत्यक्ष जगण्यातून आला, हा माझ्यासाठी एक तत्त्वचिंतनाचा विषय आहे.

मध्ये गावात काही समाजकंटकांमुळे हिंदू-मुस्लिम तणाव निर्माण होऊन दंगलसदृश्य वातावरण तयार झालं. गावात सात-आठ दिवस कर्फ्यू होता. कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून शांतता कमिटी सदस्य म्हणून मी दोन्ही समाजाच्या बैठकांना जात होतो. गावातल्या मदरशांमधील मुस्लिम समाजाच्या एका बैठकीला गेलो. मदरशाच्या ओसरीतच इरफान बसला होता. मला पाहताच लगबगीनं जवळ आला. डोळे पाण्याने भरले होते. माझा हात पकडून म्हणाला, 'सर, अब मालूम हुआ, गलत लोग गलत किताबे क्यूं लिखते है. अबसे मै पैसा मिलता है करके 'सनातन प्रभात नही बेचूंगा!'.

त्याच्या खांद्यावर हलकेच थोपटून मी न बोलताच पुढे सरकलो. न दिलेलं उत्तर काळच कधी ना कधी देतो, हेच खरं.

अलीकडं एकदा एस.टी. कँटीनमध्ये चहा पिताना चेहऱ्यावर काळजीचे भाव आणून मी इरफानला विचारलं, 'इरफान, हे असं स्टँडवर पेपर विकून तू कसं आयुष्य काढणार? अजून तुझं, तुझ्या बहिणीचं लग्नही व्हायचं आहे, संसाराच्या जबाबदाऱ्या वाढणार आहेत...'

'हाँ, फिर?' इरफान शांतपणे.

'नाही म्हणजे... या एवढ्याशा उत्पन्नात तुझं कसं चालणार? थोडाफार शिकला असतास, काही व्यावसायिक शिक्षण घेतलं असतंस तर तू काही स्वतंत्र धंदा किंवा नोकरी करू शकला असतास. तुला आता या पेपर धंद्याची चांगली माहिती झालीय. तू स्वतःच पेपरची एजन्सी का घेत नाहीस?'

'सर, सिखता तो कुछ बन जाता की नाय माहिती नाय, लेकिन सिखता तो ये पेप्रं विकायची शरम आली आसती, इत्ता नक्कीच! तुम्ही खूप आगेकी सोचतायं. मुजे तो रात के खाने की तकलीफ मिटानी होती है. आगेकी सोचता रहूं तो आजका भी काम नही होगा. आनी पेपरमधली मला आता माहिती झालेली हाय, पन डिपॉझिटला पैसे कुठनं आनू, आनी या स्टँडवाल्यास्नी इथं धंदा करायला लायन्ससाठी वरनं आनी खालनं कुठनं पैसे देऊ? निस्ता पेपर इकतोय तर भाड्यास्नी फुकट पेपर द्यायला लागतो. त्यापेक्षा हाय ते बरं चाललंय नव्हं? आगेकी अल्ला देखेगा!' उपहासानं की निराशेने कळलं नाही, इरफान चक्क हसला.

इरफान मला नियमित भेटतो. नियमितपणे आमच्यात वेगवेगळ्या विषयांवर संवाद होतो, इरफान माझे 'व्यावहारिक प्रबोधन' करतो आणि शेवटी व्यावहारिकदृष्ट्या आपण किती 'अडाणी' आहोत या जाणीवेने मी इरफानकडून घेतलेल्या पेपरमध्येच तोंड दडवतो. त्याला बिचाऱ्याला मात्र वाटतं, सर खूपच वाचनप्रेमी आहेत, कारण ते लेखक आहेत...

---


**राजा शिरगुप्पे**

'मिरालय', शिवकॉलनी, आजरा,

ता. आजरा, जि. कोल्हापूर

भ्रमणध्वनी : 9423287320


---

# नग्न वास्तव : पित्याला धक्का

**पाकिस्तानातील 'डॉन' (२ जानेवारी, ०९) या वृत्तपत्रातील नदीम एफ. पराच्या यांच्या 'नेकेड लन्च; ब्लो डॅडी' (नग्न वास्तव : पित्याला धक्का) या लेखावरून हा एका सुशिक्षित घरातील बापलेकांच्यामधला संवाद खाली देत आहे. त्यामध्ये मुसलमान व मुसलमानांसंबधी वापरण्यात आलेले शब्द काढून त्याजागी हिंदू, ख्रिश्चन, ज्यू (आणि बौद्ध व जैन सुद्धा) हे व ह्यांच्या सबंधीचे शब्द घालून पहावेत. अविवेक. आक्रस्ताळेपणा, अहंगंड, असहिष्णुता, इतिहासाची तोडमोड, विज्ञान व आधुनिक विचारसरणीचा तिरस्कार, खोटारडा प्रचार करून लोकांना (सुशिक्षितांनाही) अंधश्रद्ध बनविणे आणि आमचाच धर्म कसा सर्वश्रेष्ठ आहे हे त्यांच्या मनावर ठसविणे हे सारे सर्वच धर्मांमधून कसे बोकाळत चालले आहे ते आपल्याला समजेल. दैववाद, भविष्य कथन, कुंडल्या, बुवाबाजी यांचे स्तोम माजवण्याने आणि  आततायी, हिंसक घटना पुन्हा पुन्हा दाखविण्याने कोवळ्या वयातील मुलांच्या मनावर काय परिणाम होतो, त्याचं विदारक स्वरूप इथे स्पष्ट केलेलं आहे.**



'बाबा'

'काय रे बाळा?'

'आपली हिंदुस्थानशी लढाई होणार आहे का हो?'

'हां, होईल कदाचित.'

'मग बाबा, आपण त्यांना झोडपून काढू ना? १८५७ मध्ये झोडपलं होतं तसं?'

'१८५७ मध्ये नाही रे बाळा.'

'बरं बरं, मग आपण १८५७ मध्ये कोणाला झोडपलं?'

'ब्रिटिश लोकांना.'

'आणि हिंदूंना सुद्धा, हो की नाही?'

'अरे असं पहा...'

'त्या लढाईमध्ये कायदे आझम सुद्धा लढले होते का हो बाबा; महम्मद बिन कासिम आणि इमरान खान ह्यांना घेऊन?'

'नाही, कायदे आझम आणि इमरान खान त्यानंतर कितीतरी वर्षांनी जन्मले. आणि महम्मद बिन कासिम तर कितीतरी वर्षे त्यापूर्वीच मेला.'

'असं, मग तेव्हा पाकिस्तानात कोणाची सत्ता होती?'

'तेव्हा पाकिस्तान नव्हतंच.'

'काय सांगताय बाबा! पाकिस्तान तर नेहमीच होतं. गेली ५ हजार वर्षे पाकिस्तान आहे!'

'हे कोणाकडून ऐकतोस रे तू?'

'कोणाकडून नाही; मी टीव्ही पहात होतो.'

'हां, आलं लक्षात माझ्या.'

'बाबा, हे लोक आम्हा अरबांच्या का विरुद्ध आहेत हो?'

'अरब; बाळा आपण अरब कुठे आहोत?'

'नाही कसं, आहोतच आपण अरब. आपले पूर्वज अरबी नाहीत का?'

'नाही रे बाळा; आपले पूर्वज म्हणजे उपखंडातील वंशाचे लोक होते.'

'उप... काय?'

'ते जावू दे; पण तुला एकंदरीत लढाया फार आवडतात नाही का?'

'हो बाबा, मला टीव्ही वर लढाया पाहायला खूप मजा वाटते.'

'अरे, पण खऱ्या लढाया लढल्या जात आहेत टीव्हीच्या बाहेर. टीव्हीमध्ये नाही.'

'खरंच? पण ते कसं शक्य आहे? बाबा या लढाया कशा असतात हो?'

'ते जावू दे रे.'

'बाबा काय झालं? तुम्हांला कशाची काळजी वाटते आहे का?'

'काळजी नको करू तर काय करू; काय वायफळ बडबड चालवली आहेस लढायांची; मूर्ख कुठला!'

'बाबा, पण तुम्ही माझ्यावर का चिडता?'

'कारण टी.व्ही. वाटेल ते बडबडतो आणि तेच तूही बरळतोस!'

'बाबा, तुम्ही हिंदूंचा कैवार घेत आहात!'

'नाही.'

'मग तुम्ही काफीर झाला आहात?'

'गप्प बस आता, खूप झालं. आता टीव्ही पाहायचा नाही. जा डीव्हीडीवर एखादा सिनेमा पहा नाहीतर सीडी ऐकत बस.'

'ते नाही मी करू शकत हो, बाबा.'

'का बरं? आपल्याकडे तर कितीतरी डीव्हीडी आणि सीडी आहेत.'

'होत्या; आता नाहीयेत.'

'अरे, नाहीयेत म्हणजे काय?'

'मी त्या सगळ्या जाळून टाकल्या.'

'हां, ते मी ऐकलं होतं. अरे, पण का केलंस असं?'

'कारण त्या अश्लीलता फैलावणाऱ्या घाणेरड्या, शरम वाटेल अशा होत्या.'

'अरे देवा! बरं मग जा तुझं होमवर्क कर. तुझ्या त्या सायन्स प्रोजेक्टचं काय झालं?'

'ते जवळ जवळ संपलं आहे.'

'त्यामध्ये तू काय करतो आहेस रे?'

'बॉम्ब.'

'काय म्हणालास? बॉम्ब?'

'हो बाबा, बॉम्बच.'

'ते ऐकलं मी, अरे पण बॉम्ब कशासाठी?'

'कशासाठी म्हणजे? मी सच्चा मुसलमान आहे आणि म्हणून मी अमेरिकेचा द्वेष करतो.'

'अरे, पण गेल्याच आठवड्यात तुला डिस्नेलँडला जायचं होतं ना?'

'बाबा, ती गोष्ट अगदी वेगळी आहे हो.'

'का बरं?'

'अहो, मिकी माऊस मुसलमान आहे.'

'छे रे, तो मुसलमान नाहीये.'

'तो मुसलमान झाला आहे. त्याने चंद्रावर आजान ऐकलं ना तेव्हा.'

'काय चंद्रावर? आणि आजान ऐकलं?'

'हो. कारण पृथ्वी सपाट आहे आणि...'

'का ऽऽय?'

'पृथ्वी आहे...'

'ते ऐकलं मी.'

'बाबा, तुम्हांला माझा सायन्स प्रोजेक्ट पाहायचा आहे ना?'

'बापरे, तो बॉम्बचा प्रोजेक्ट? तुझ्या सायन्सच्या बाई तुला नापास करतील.'

'त्या मला नापास करूच शकणार नाहीत.'

'खरंच?'

'हो, अगदी खरं. कारण त्या सायन्सवाल्या बाईंनाही मी उडवून देणार आहे.'

'हाय अल्ला! अरे तुला झालंय तरी काय? जा तुझ्या आईला बोलावून आण.'

'नाही हो, ती नाही येऊ शकणार.'

'का नाही येऊ शकणार?'

'मी तिला स्वयंपाक घरात कोंडून ठेवलंय.'

'अरे, पण कशासाठी असं केलंस?'

'म्हणजे काय? बायकांची जागा स्वयंपाकघरातच असते ना; नीट बुरखा पांघरून घेतल्याशिवाय मी तिला बाहेर येऊ देणारच नाही.'

'अरे, पण ती तुझी आई आहे!'

'पण, ती एक बाई पण आहे.'

'मग?'

'मग काय? तिला लपवूनच ठेवलं पाहिजे.'

'लपवून? कोणापासून?'

'सारं जग आणि टोनीपासून.'

'टोनी?'

'हो, टोनी.'

'अरे, पण टोनी तर मांजर आहे.'

'मांजर असलं तरी तो बोका आहे.'

'अरे मुला, तुला वेड लागलंय का?'

'नाही. शिवाय किट्टोसुद्धा बुरखा घालील याचीही मी खबरदारी घेतली आहे.'

'किट्टो?'

'हो, किट्टो.'

'अरे, पण किट्टो तर मांजर आहे.'

'पण ती मांजरी आहे, मादी आहे ना.'

'बुरख्यामध्ये ती गुदमरेल रे!'

'ती मेली सुद्धा.'

'काऽऽय?'

'ती आधीच मेली आहे.'

'हं, ते मी समजलो, पण कशी मेली?'

'मी तिला जिवंतपणी पुरून टाकली.'

'काय म्हणालास; पुरून टाकली?'

'हो. टोनीच्या इज्जतीचा बदला घेण्यासाठी. पण आता मी टोनीचंही डोकं उडवून देणार आहे.'

'अरे, पण का?'

'कां म्हणजे; आईची इज्जत राखायची आहे म्हणून.'

'अरे देवा!'

'अहं; तसं नका म्हणू. नेहमी हाय अल्ला म्हणा.'

'का? त्याने काय फरक पडतो?'

'बाबा, तुम्हांलाही आपलं डोकं उडवून घ्यायचं आहे का?'

'नाही.'

'मग दगडांच्या माराने चेंदून मरायचंय का?'

'नाही.'

'मग तुम्हांला फटके खायचे आहेत का?'

'नाही.'

'मग तुम्हांला स्वतःचे हात छाटून टाकणं आवडेल?'

'नाही.'

'मग असे मूर्खासारखे प्रश्न विचारणं सोडून द्या.'

'मग तू मला काय म्हणून हाक मारशील?'

' 'बाबा' या शब्दासाठी अरेबिकमध्ये जो शब्द असेल त्या शब्दाने मी तुम्हाला हाक मारेन.'

'अरे, पण मला कुठे अरेबिक येतंय?'

'नाही येत, कारण तुम्ही काफीर आहात.'

'तू कोण आहेस रे मला काफीर ठरविणारा? मूर्ख फॅशिस्ट; बडबडतोय केव्हाचा.'

'फॅशिस्ट म्हणजे काय?'

'फॅशिस्ट म्हणजे एक विवेकशून्य, दांडगट, घमेंडखोर, वेडा माणूस.'

'काऽऽय?'

'अरे, तुला रडायला काय झालं?'

'तुम्ही मला रागावलात.'

‘बरं, बरं. माफ कर मला. पण बेटा तू आता सहिष्णू आणि विवेकी व्हायला हवंस. आता जा आणि शहाण्यासारखं पुस्तक वाच. टी.व्ही. नको पाहूस.’

‘पण माझ्याजवळ पुस्तकंच नाहीत.’

‘नाहीत कशी? असायलाच हवीत. मी किती पुस्तकं आणून दिली आहेत तुला.’

‘ती तर मी सगळी पुरून टाकली.’

‘अरे, पण का?’

‘ती सगळी इंग्रजीत होती.’

‘मग?’

‘ती मुसलमानांची भाषा नाही.’

‘पण आपण आता इंग्रजीच बोलतो आहोत ना?’

‘पण...’

‘आता काय?’

‘झिओनिस्टांनी मला अरेबिक विसरायला लावलं.’

‘अरे पण तुला अरेबिक कधी येतच नव्हतं.’

‘नाही असं नाहीये. तुम्ही आणि आईनं मला पोलिओचे थेंब दिलेत त्याअगोदर मला अरेबिक येत होतं.’

‘बरं, आता तू माझ्यावर एक मेहेरबानी करशील का?’

‘नक्की करीन बाबा.’

‘माझ्यासाठी एक गोष्ट उडवून टाकायची आहे. उडवशील?’

‘नक्कीच. सांगा काय उडवू? सीडीचं दुकान, हॉटेल का शाळा?’

‘नाही नाही; त्यापेक्षा बरंच जास्त दुष्ट आणि अमंगळ.’

‘आईला उडवू?’

‘नाही.’

‘मग काय?’

‘तो टी.व्ही. सेट.’

‘काऽऽय?’

‘हा टीव्ही सेट उडवून टाक.’

‘ते मी ऐकलं बाबा, पण का?’

‘मी सांगतोय ना; तेवढंच कर.’

‘अस्सं! बाबा?’

‘काय रे?’

‘तुम्ही किती बेसनदशीर आहात!

---------------

– अनुवाद : **सुमन ओक**
Tel. : 020-26802140
sumanoke@hotmail.com

---

*पृष्ठ ८ वरून)*

## ब्युरोक्रसी : ए नेसेसरी एव्हिल

सुख, चैन, भोग-उपभोग हवा. त्यासाठी कसाही करून पैसा हवा, ही आजच्या समाजाची मानसिकता नोकरशाहीतही तेवढीच तीव्र आहे. उलटपक्षी, त्यांना पदाची सुरक्षितता व अफाट अधिकार असल्यामुळे पैसा ओरबाडायची अधिक व थेट संधी मिळते. त्यामुळे भ्रष्टाचार बोकाळणार नाही तर काय होणार?

आणि, तिसरे कारण म्हणजे, नोकरशाहीने आपली वैशिष्ट्यपूर्ण सकारात्मक तटस्थता व घटना-कायद्यांची बांधिलकी विसरून पद, पदोन्नती व बदलीसाठी राज्यकर्त्यांपुढे अक्षरश: शरणागती पत्करली आहे, त्यांच्याशी युती केली आहे. राज्यकर्ते व नोकरशाही यांच्यात ‘चोली-दामन का रिश्ता’ म्हणता येईल असा घट्ट, काळा व अनैतिक संबंध जडला गेला आहे.

हे अराजकतेचे द्योतक आहे. कारण सामान्यजनांचा सरकार व कायदा व्यवस्थेवरचा विश्वास उडतो, तो क्षण अराजकतेची नांदी असते. भारतात अराजकतेच्या नाटकाचे पर्व सुरू झाले आहे, असे म्हणायला हरकत नसावी.

पण याचा अर्थ असा नाही की, भारतातील आजच्या अराजकतेला केवळ नोकरशाहीच जबाबदार आहे. उलटपक्षी, अराजक रोखण्याची व देशाची एकात्मता अभंग ठेवण्याची तिच्यात फार मोठी ताकद आहे आणि आज साठ वर्षांनंतर मागे वळून पाहता, सर्व दोष व अवगुण जमेस धरूनही देशाची एकात्मता व अखंडता राखण्यात तिला मिळालेलं यश स्पृहणीय आहे.

पण अंमलबजावणीचे सर्वाधिकार असल्यामुळे नोकरशाहीचे दोष व तिची कुरुपता ठळकपणे नजरेत भरते एवढंच. तसेच जगभर सर्वत्र नोकशाही एका विशिष्ट गतीने चालत असते. समाजाला कितीही दोषपूर्ण वाटली तरी, नोकरशाही ती गती सोडत नाही. म्हणून असा प्रश्न पडतो की, नोकरशाही अशी का वागते? तिच्यात सुधारणा होऊन प्रगतीला वाव मिळू शकतो का? जनतेच्या आशा-आकांक्षांशी ती केव्हा व कशी एकरूप होऊ शकेल? हे शक्य आहे काय?

अर्थातच शक्य आहे. त्यासाठी प्रथम नोकरशाहीचे रूप, तिची मानसिकता, तिचा प्रकृतिधर्म म्हणजेच ‘सायकॉलॉजी अँड मॉरफियॉलॉजी ऑफ ब्युरॉक्रसी’ आपण समजून घेतली पाहिजे. म्हणजेच डॉक्टरी भाषेत सांगायचे तर प्रथम रोगाचे निदान अचूक व्हायला हवे, तरच योग्य ती उपाययोजना करता येईल. हे सारं पुढील अध्यायात.

------------------------

**– लक्ष्मीकांत देशमुख**
शामसुंदर सोसायटी, ४३४/९-१० सॅलिसबरी पार्क, पुणे ४११०३७.
Mob. 9325297509, 9823533128.
E-mail - laxmikant05@yahoo.co.in

------------------------

**आपल्या वर्गणीची मुदत संपली तर नाही ना?**

अस्वस्थ आणि आश्वस्त

# गोवा अस्वस्थ होत चालला आहे...

मागच्या महिन्यात मी गोव्याला गेले होते. निमित्त होते गोव्यातील समाजसेवा संघाच्या अमृतमहोत्सवाचे. गोव्यात समाजसेवा संघ ही एक ऐतिहासिक संस्था आहे. स्त्री-शिक्षण आणि सामाजिक प्रबोधन हे उद्दिष्ट मनात ठेवून आणि स्त्री-शिक्षणाला चालना देणाऱ्या धोंडो केशव कर्वे यांचा आदर्श समोर ठेवून समाजसेवा संघाची स्थापना १९३३ मध्ये करण्यात आली. सोबतच महिला विद्यालयाची स्थापना करण्यात आली. संस्थापक होते गोव्यातील काही समाजसेवक- केशव बाब, अनंत नायक, कृष्ण नारायण नायक, दामोदर अच्युत कारे, गोविंद रामनाथ इत्यादी...

पोर्तुगीजांच्या वसाहतीच्या काळात हे फार सोपं नसणार, कारण तेव्हाच्या गोतंमकीय सरकारचा उद्देश गोव्याची भारतीय संस्कृतीशी असलेली नाळ तोडण्याचाच होता आणि समाजसेवा संघाशी संबंधित लोक गोवा मुक्ती आंदोलनाशी अर्थातच जोडलेले होते.

हे सर्व सांगायचा उद्देश हा की, समाजसेवा संघ ही संस्था अजूनही पाय भक्कम रोवून उभी आहे आणि स्वातंत्र्य चळवळीतल्या विचारांचा प्रसार करण्याचे काम करीत आहे. समाजसेवा संघाचे विद्यमान अध्यक्ष दत्ता नायक हे जाणीवपूर्वक पुरोगामी चळवळीशी नातं जोडून आहेत.

गोवा आता बदलतो आहे. तिथल्या राजकीय क्षेत्रात भाजपने शिरकाव केलेला आहे. कर्नाटक आणि अन्य प्रांतातून रोजगारासाठी स्थलांतरित झालेल्यांमध्ये मुसलमानांचे प्रमाण मोठे आहे. गोव्यातील हिंदु-मुस्लिम शांतताप्रिय सुरोगाद आता मात्र गोवा अस्वस्थ होत असल्याची चाहूल लागते आहे.

गोव्याचं एक महत्त्वाचं वैशिष्ट्य हे की तिथे कुठल्याही धर्मावर आधारित व्यक्तिगत कायदा नाही. तिथे सर्वांसाठी पोर्तुगीज कायदा लागू आहे. शाहबानो प्रकरणाच्या वेळी तिथे जमाते इस्लामीचे तेथील नेते अशरफ आगा यांनी मुस्लिम व्यक्तिगत कायदा लागू करण्याची मागणी केली होती. तेव्हा गोव्यातील रशिदा मुजावर या तरुणीने गोव्यातील मुस्लिम महिलांना एकत्रित करून त्या विरोधात आवाज बुलंद केला होता. कारण पोर्तुगीज कायद्यामुळे तिथे जुबानी तलाक व बहुपत्नीत्व नाही. शिवाय वारसा हक्क, संपत्तीत वाटा आहे. मी १९९३ मध्ये गोव्यातील मुस्लिम महिलांच्या मुलाखती घेतल्या होत्या, तेव्हा अनेक महिलांनी मला सांगितले होते की त्यांच्या मुलींची लग्ने त्यांना गोव्याबाहेर करावीशी वाटत नाहीत. कारण बाहेर जुबानी तलाक, पोटगी नसणे, बहुपत्नीत्वाचा पुरुषाचा अधिकार इत्यादी गोष्टींची त्यांना भीती वाटते. शिवाय गोव्यात मोकळेपणा आहे, पडदा नाही हेदेखील त्यांना चांगले वाटते. हुंड्याची पद्धत वाढत चालली आहे हे मात्र वाईट आहे असे त्यांचे मत होते.

गोव्यातील मुस्लिम तरुणांच्याही मुलाखती त्यावेळेला मी घेतल्या होत्या. त्यांचे म्हणणे होते- शिक्षण महत्त्वाचे आहे, कारण आता गोव्यातील मुसलमानांना कुठलाही पारंपरिक व्यवसाय उरला नाही. पोर्तुगीजांच्या काळात त्यांना पोलिसात भरती करून घेतलं जाई, आज मात्र ते बेरोजगार आहेत. त्यामुळे गल्फमध्ये ते नोकरीला जातात. शिवाय, बाबरी मशीद ज्या पद्धतीने पाडण्यात आली त्यानंतर त्यांना त्यांचं मुस्लिम म्हणून अस्तित्व जाणवायला सुरुवात झाली.

या सर्व गोष्टींचा परिणाम गोव्यातील मुस्लिम समाजावर होतो आहे. शिवाय अन्य प्रांतातील येणारे मुस्लिम, तबलीगची चळवळ या सर्व गोष्टी आणि सोबत गोव्यात भाजपाचा प्रवेश. गोव्यात हिंदु-मुस्लिम आणि हिंदु-ख्रिश्चन, मुस्लिम-ख्रिश्चन ही दरीदेखील वाढते आहे. या सर्व गोष्टींमुळे गोवा अस्वस्थ होत चालल्याचे जाणवते. दुसरीकडे विकासाच्या नावाने चाललेली गोव्याची लांडगेतोड, जागतिकीकरणात पर्यटन व्यवसायाचे बदलले स्वरूप; परकीय हॉटेल कंपन्यांचे अतिक्रमण आणि चळवळी मात्र क्षीण झालेल्या आहेत.

संदेश प्रभुदेसाय हा तरुण पत्रकार मित्र, डाव्या चळवळीतून आलेला. १९९३ मध्ये 'टाइम्स' फेलोशिपच्या माझ्या अभ्यासात गोव्यात माझ्यासोबत हिंडून संदेशने मदत केली होती. आता तो प्रूडंस नावाच्या खाजगी वाहिनीत काम करतो, पण वैचारिक गाभा कायम ठेवून. आज तो अस्वस्थ दिसतो. दत्ता नायक अस्वस्थ दिसतात. दत्ता नायकांनी 'सांप्रदायिक सद्भावना आणि भारतीय धर्मनिरपेक्षता' या विषयावरच माझं व्याख्यान ठेवलं होतं. आशेची गोष्ट ही आहे की दत्ता नायकांनी आपल्या विचारांच्याभोवती माणसं चांगली संघटित केली आहेत. त्यामुळे ते काही प्रश्न विकोपाला जायच्या आधीच हस्तक्षेप करतात.

गोव्याहून परतताना मनात अस्वस्थता होती, पण भारतीय राज्यघटना, धर्मनिरपेक्षता, सांप्रदायिक सद्भावना, गोव्याचा मूळ स्वभाव या सर्वांवर विश्वास असलेले दत्ता नायक आणि संदेश प्रभूदेसाय तिथे आहेत आणि आपण एकमेकांना हाक घालू शकतो ही आश्वस्तताही होती.

गोव्यात समता आंदोलनाच्या स्थापनेत दत्ता नायक अग्रेसर होते. न्यायमूर्ती म.गो.रानडे यांच्या सामाजिक परिषदेचे तिसरे अधिवेशन त्यांनी गोव्यात घेतले. धर्मनिरपेक्षता, समता, सामाजिक न्याय यासाठी त्यांनी केलेले काम फार मोठे आहे. महाराष्ट्रातील चळवळींशी त्यांचा निरंतर संबंध आहे. ते स्वत: बांधकाम व्यावसायिक आहेत, पण चळवळीसाठी त्यांनी जे योगदान दिले आहे ते वरवरचे नसून त्यासाठी बांदिलकीपूर्वक काम केले आहे. त्याबद्दल त्यांना सलामच करायला हवा.

---

**रझिया पटेल**

P-17, सुयोग हाईट्स, रामबाग कॉलनी, पौड रोड, पुणे ४११०३८.

raziap@gmail.com. (Mob. : 9823074054)

---





राजकुमार तांगडे

# पांढरं सोनं पिकवणारा काळा ठिक्कर पडलाय...

'शासकीय कापूस खरेदी केंद्रातील गंजीला आग, सत्तर लाखांचा कापूस जळून खाक!' दुसऱ्या दिवशी जालन्याची बातमी पेपरला चार कोटीचा कापूस जळून खाक. अन् मनात धसकन् झालं. क्षणात घरात साठवलेल्या कापसाचं ध्यान झालं. दहा खनाच्या घरात दहा माणसं... कापूस.... खायचा दाना-कपडा-लता, उतरंडी, चिमनी अन् कापसाच्या बगलेत बसलेली चूल. त्यात भर पाहुणे-रावळे अन् म्हातारीची देवाची उदबत्ती अन् म्हाताऱ्याच्या बिड्या, इतके जणं चार महिन्यापासून एकत्रच नांदतो. दोन महिने झालेत फेडरेशन उघडून, पण तिथंही आषाढी-एकादशी सारखी कापूस विकायला रांग... कापूस घरात साठवून ठेवला म्हणजे लई जहागीरदाराची औलाद म्हणून नाही तर केवळ बैलगाडीनं कापूस विकायला पाठवला तर पंधरायेक दिवस बैल आणि माणसं फेडरेशनमध्ये ताटकळत बसणार, अन् अन्न-पाण्यावाचून दोघांच्याही पोटाची हेळसांड. ट्रॅक्टरमध्ये कापूस भरणारा गावात एकअर्धा बहाद्दर. नाहीतर दोन-तीन शेतकऱ्यांच्या मालातही ट्रॅक्टर भरत नाही. इतका या वर्षी उतार. गावात ट्रॅक्टरदेखील फार नाहीत. घेणाऱ्याच्या नव्या ट्रॅक्टरचं आयुष्य दोन-तीन वर्षांचं... नाहीतर लगेच फायनान्सवाले ओढून नेतात. आहेत त्या ट्रॅक्टरवरच मारामार. ट्रॅक्टरमधील कापसाचाही गेल्यागेल्या तोल होत नाही. आठ-दहा दिवस लागतात. त्याची खुट्टी (हॉटेलिंग चार्ज) लागते. आणि हे सगळं नगदी द्यावं लागतं. पण कापूस मात्र शासकीय खरेदीकेंद्रात उधार घेतात. म्हणून बऱ्याच जणांना शासकीय कापूसखरेदी केंद्राला कापूस विकण्यात रस नाही आणि ते चालवणारांना तर नाहीच नाही. म्हणूनच जी आपलेपणाची भावना घरात साठवलेल्या कापसाविषयी आहे ती भावना केंद्रात साचलेल्या कापसाविषयी नसल्यानं ऐन तारुण्यात म्हणजे तिशीतच या योजनेचा 'खून' करण्यात आला आणि पांढरं सोनं पिकवणारा काळा ठिक्कर पडला.

ऐंशीच्या दशकाच्या सुरुवातीला या शासकीय खरेदी योजनेला सुरुवात झाली. व्यापाऱ्यांच्या लुटीच्या धोरणातून सूट मिळावी... शेतकऱ्याला आपलं आणि हक्काचं वाटावं असं हे दुकान. अगदी दारात उघडलं गेलं म्हणजे भूक लागली की 'ताट' उपलब्ध अशी ती उघडण्याची तजवीज. कापूस बोंडं फुटली की शुभारंभाची नारळं फुटायचे. मानाची शाल-पागोटी मिळविण्यासाठी शेतकऱ्यांमध्येही स्पर्धा होऊ लागली. तेथील कर्मचारीदेखील फक्त पगाराच्या पैशावरच कामं करायचे. त्यामुळे कापसाच्या गाडीचं टोकन नुसत्या नोंदीवरच मिळायचे. हमालसुद्धा दक्षिणेची लालसा न ठेवता कापसाचं वस्त्र अंगावर चढवायचे. बाजार समिती आणि खरेदी-विक्री संघाचे कर्मचारी पट्ट्या खरडताना एकमेकांना खुनावत नसत. ग्रेडर ही गंजीसारखा स्वच्छ दिसायचा. नवदांपत्यासारखं सगळं मजेत. रात्रभर तुडवून भरलेली कापसाची गाडी पहाटेच केंद्रात दाखल व्हायची. अन् दुपारच्या जेवनाला बैल-माणसं घरी, रिकामी भोतं अन् पल्ली संध्याकाळच्याला शेजाऱ्याच्या कामी यायची. आठवडी बाजाराच्या पूर्वसंध्येला कापसाचे पैसे खिशात.

भारतातील कुठल्याही योजना दूरदृष्टी आणि सदसद्‌विवेक जागा असणाऱ्यांच्याच सुपीक डोक्यातून बाहेर पडल्यात. पण ज्या हातांनी त्या राबवल्या ते हातापुरतं पाहणारे आणि अविवेकीच निघाले. म्हणून भारतात राबविल्या जाणाऱ्या योजनांची गत हिंदी सिनेमाच्या उलट झाली. प्रत्येक योजनेचा शेवट कडूच... कापूस-खरेदी योजना त्याला अपवाद कशी असेल. सुरुवातीचा काही काळ सुरळीत चाललेल्या या योजनेच्या दारात असणाऱ्या वाहन नोंदणीस असणाऱ्या कारकुनांनी नोंदणी फी चालू केली आणि बस व्यापाऱ्यांची वाहनं घरातून थेट काट्यावर जाऊ लागली. पगाराव्यतिरिक्त उत्पन्न देऊ लागली. हमालांनी 'वर' दक्षिणा घ्यायला सुरुवात केली ती पाणी मारलेला, झोडीचा कापूस बिनबोभाट मोजण्यासाठी... ग्रेडरनेही निमूट सहन केले 'आर्धे तुम्ही आर्धे आम्ही' म्हणत. पाहता पाहता शासकीय कापूसखरेदी केंद्र उद्योगकेंद्र बनले. पोटापुरता कापूस केंद्रात जमा झाला की गंजी पेट घेऊ लागल्या. मूठभरांच्या स्वार्थापायी हजारो कष्टकऱ्यांचा घाम जळून खाक. बरं त्यांना संधी उपलब्ध करून देणारेसुद्धा आपणच.... शेतकऱ्यांना बँकेने दिलेले कर्ज शासन कापूस-खरेदीतून परस्पर कापून घेणार. त्या भितीपोटी कित्येक शेतकऱ्यांनी दुसऱ्याच्या नावावर कापूस विकला, पण तिथंही विश्वास आड येऊ लागला. आलेला बोनस ज्याच्या नावावर विकला तो हडप करू लागला, म्हणून कास्तकारांना व्यापाऱ्याशिवाय पर्यायच उरला नाही. ज्या खाजगी व्यापाऱ्यांना पर्याय म्हणून ही खरेदी योजना चालू केली ती बरोबर त्यांच्याच हाती सोपविली ती बंद पाडण्यासाठीच त्यांच्या हस्तकांनी बरोबर डाव साधला. म्हणूनच आज केवळ खरेदीच्या गैरसोयीमुळे शेतकऱ्यांच्या घरात कापूस तसाच पडून राहतोय. फेडरेशनला पंधरा पंधरा दिवस मोजमापामुळे रखडावं लागतंय. पैशाचे टप्पे पडताहेत. हमी भावाच्या नावाखाली कमी भावानं विक्री करावी लागते. कापूसवेचणी हंगाम चालू होऊनही दोन दोन महिने खरेदीकेंद्रे चालू होण्यास विलंब होतोय. या मृत झालेल्या योजनेला 'मतां'च्या सामर्थ्यावर किती दिवस जगवणार. तिचं जगणं मतावर अवलंबून नाही तर जळणाऱ्या गंजीवर आहे. तिचं जळणं थांबलं तरच ती जगू शकेल.

-----------------------------------

**राजकुमार तांगडे**

-----------------------------------

('शेती आणि 'नाटक' करणाऱ्या या तरुणाचे 'बोचकारे' हे सदर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या अंकात प्रसिद्ध होईल. **– संपादक**)

मित्र माझे



नीलेश मोडक

# तिची खंत अन् तिचं स्वप्न

जेऊरला जाण्याची माझी पहिलीच वेळ... डिसेंबरचा शेवटचा रविवार. सकाळी सहा वाजताच आम्ही निघालो. हवेतील गारवा हळूहळू सुसह्य होऊ लागला होता. मोकळ्या रस्त्यावरून गाड्या घेऊन आम्ही सुसाट वेगाने पुण्याबाहेर पडलो. आता दुतर्फा होती फक्त उंच झाडं, दाट झुडपं किंवा मोकळं मैदान... थोड्याच वेळात घाटाचा रस्ता सुरू झाला तेव्हा उंच इमारती, भव्य होर्डींग्ज, वाहनांचा असह्य धूर आणि आवाज असं बरंच काही आम्ही दरीत सोडून आल्याचं स्पष्ट दिसत होतं. हे सगळंच अत्यंत विलोभनीय आणि हवहवंसं वाटत होतं, पण खरं तर जेऊर अजून बरंच दूर होतं...

घाटातून जाताना मला सहजच नेरळची ट्रीप आठवली–

नुकतीच टी.वाय.ची परीक्षा संपली होती. कुठंतरी फिरायला जायचं, म्हणून आम्ही नेरळच ठरवलं. त्याला कारणही होतं तसंच. नेरळला माझ्या एका मित्राच्या काकांची शेती आहे. ती खूप छान आहे, तिथे खूप मजा येईल आणि पैसेही लागणार नाहीत म्हणून मग नेरळ. प्रवासात खूप मजा आली. नेरळला पोचताच एका सुंदर कमानीतून आम्ही काकांच्या शेतात प्रवेश केला. शेत खरंच खूप सुंदर होतं. शेताला चोहीकडून कुंपण होतं. एकीकडे पिकलेल्या फळांनी लगडलेली आंब्याची झाडं, तर दुसरीकडे टवटवीत कमळफुलांनी सजलेला तलाव... तिथंच जरा पुढे एक मोठा मत्स्यशेती विभाग... त्यालाच लागून असलेली कोळंबीची शेती... मग छोटीशी गुलाब–फुलांची बाग... शेताच्या मधोमध एक टुमदार घर... त्याचं मातीनं सारवलेलं अंगण... तुळशीवृंदावन... हे सगळं आमच्या शेतीच्या व्याख्येत मुळीच बसणारं नव्हतं. त्यामुळे आम्ही शेतात नाही, तर एखाद्या पर्यटनक्षेत्रातच आल्यासारखं वाटलं.

काकांनी मस्त झुणका–भाकरीचा पाहुणचार दिला. शेतातूनच तोडून आणलेल्या हिरव्या मिरच्यांचा ठेचा आणि पाथीचा कांदा तर लाजवाबच. दुपारी थोडा आराम केला. चेहा घेऊन शेतात पुन्हा एक फेरफटका मारला नि परतीची तयारी सुरू केली. सगळ्यांसाठीच हा खूप वेगळा अनुभव होता. परीक्षेमुळे आलेलं दडपण दूर कुठंतरी पळून गेल्यासारखं वाटलं. कमानीजवळ काका आमची वाट बघत, हातात आंबे, कांदे, मिरच्यांनी भरलेल्या पिशव्या घेऊन उभे होते. त्यांच्याही चेहऱ्यावर वेगळंच समाधान होतं. आम्ही मनापासून काकांचे आभार मानले.

''पुन्हा जरूर या बाळांनो...'' असं म्हणत काकांनी पाठीवर मायेची थाप दिली, खरंच आम्हालाही परत यायचंच होतं.

''पण काका, मला वाटतं तुम्ही आमच्याकडून पैसे घ्यायला हवेत... किमान दीडशे रुपये तरी...'' रसिकाचं हे वाक्य ऐकून क्षणभर आम्ही दचकलोच...

रसिका फाटक, माझी वर्गमैत्रीण... पुण्यातल्याच एका सुशिक्षित सुखवस्तू कुटुंबातली मुलगी. शेती, शेतकरी, पीक अशा गोष्टी इतक्या जवळून बघण्याचा अनुभव तिला ह्यापूर्वी क्वचितच आला असेल...

उणीपुरी दोन वर्षे लोटली असतील ह्या प्रसंगाला... त्याच रसिकाने आज जेऊरला एक कृषिपर्यटन क्षेत्र विकसित केलंय आणि तिथेच आम्ही मित्र नव्हे, तर पर्यटक बनून निघालो होतो. साधारण दीड वर्षांपूर्वी एम.एस्सी. (बायोडायव्हर्सिटी)ला प्रवेश घेतल्यावर, अनिवार्य संशोधन प्रकल्पासाठी 'कृषीपर्यटन' हा विषय निवडण्याच्या तिच्या निर्णयाची बीजं नेरळमध्येच रुजल्याचं मला जाणवतं...

''जेऊर पुण्याहून तसं जवळ आहे. चांगले रस्ते, मुबलक पाणी अशा मूलभूत सोयी इथं आहेत आणि संपूर्ण गाव नयनरम्य निसर्गसौंदर्यानं नटलेलं आहे. म्हणूनच जेऊरची निवड केली...' इति रसिका.

विषयच पुस्तकी नसल्यानं त्याचा अभ्यासही पुस्तकाबाहेर जाऊनच करावा लागेल, याची रसिकाला स्पष्ट कल्पना असावी. म्हणून अभ्यासाच्या सुरुवातीलाच तिने 'ॲग्रोटुरिझम डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन'चं कार्यालय गाठलं. तिथल्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. महाराष्ट्रातील कृषिपर्यटन क्षेत्रांविषयी माहिती घेतली व थेट त्या क्षेत्रांना भेटी द्यायला सुरूवात केली, पण बहुतांश केंद्रं अद्याप सुरूच झाली नव्हती. त्यामुळे हवा तसा प्रतिसाद तिला मिळाला नाही.

''रूढ कृषी पर्यटनाची संकल्पना नाही मला पटत. ती बरीच खर्चिक आहे, त्यामुळे सामान्य शेतकऱ्यांना ती परवडणारी नाही. आर्थिक मदत मिळत असली तरी मुळात हा खर्चच मला अनावश्यक वाटतो.'' ह्याच विचारांतून तिने 'कृषिपर्यटना'ची नवी संकल्पना साकारली. ''माझ्या मते पर्यटकांना मुख्यत्वे तीन गोष्टी हव्या असतात... आराम, उत्तम जेवण आणि सुरक्षितता. माझ्या पर्यटनक्षेत्रात ह्या तीनही गोष्टी असतील.'' अशी ही सहज, सोपी आणि अत्यंत स्वस्त तिची कृषिपर्यटनाची संकल्पना.

ओळखीच्या गणेशनामक जेऊरच्या एका शेतकऱ्याच्या शेतावर

हे क्षेत्र उभारायचं असं तिनं ठरवलं... पण हे इतकंही सोपं नव्हतं. मुळात गणेशला कृषीपर्यटनाची पुसटशीही कल्पना नव्हती. बरं ती समजावून सांगितल्यावर, शहरातील माणसं आपल्या शेतावर येऊन धिंगाणा घालतील आणि शेतातली कामं सोडून आपल्याला त्यांच्याच मागे राहावं लागेल, अशी भीतीही त्याला वाटू लागली. सतत फोन करून, प्रत्यक्ष भेटून, ह्या संकल्पनेचं महत्त्व पटवून द्यायला अन् त्याचा होकार मिळवायला रसिकाला तब्बल एक महिना लागला. पण प्रश्न पूर्णत: सुटला नव्हताच. गणेशच्या होकारानंतर, गावातूनच विरोध होण्याची मोठी भीती निर्माण झाली. त्यामुळे गावचे सरपंच व काही गावकरी यांच्याशी चर्चा करून त्यांना विश्वासात घेणे अत्यावश्यक होते.

अडीच-तीन महिन्यांच्या ह्या (दिशाहीन) धावपळीनंतर शेवटी तिने खऱ्या कामाला सुरुवात केली. ''कृषीपर्यटन क्षेत्रं केवळ मजा करण्यासाठी नसावेत.'' ह्या ठाम मताला धरूनच तिने प्रकल्पबांधणी सुरू केली.

पर्यटक म्हणून जेऊरला पोचल्यावर तिने आमची व्यवस्था एका कौलारू घरात केली. थोड्याच वेळात गरम चहा मिळाला. मग आम्ही गावालगतचा एक बंधारा बघायला गेलो. तिथं पाणी अडवण्यासाठीची अनोखी पद्धत आणि पाण्याचं नियोजन करणं कसं आदर्श आहे, ह्याची माहिती देत होती तेव्हा ती माझी मैत्रीण असल्याचा मला क्षणभर विसरच पडला. तिथून मग गावातलं देऊळ, गणेशची नर्सरी, कॅनॉलच्या पाण्यात मनसोक्त डुंबणं, असं करीत करीत दुपारी जेवणाच्या वेळी आम्ही परतलो. दरम्यान वाटेत अनेक पक्षी, झाडं, माती ह्यांची वर्षानुवर्षाची ओळख असल्यागत ती माहिती देत होती...



जेवण अर्थातच गणेशच्या मळ्यात... वांग्याचं भरीत अन् भाकरी...

जेवताना रसिकाशी बरंच बोलणं झालं... ''पर्यटन क्षेत्र म्हटलं की रेस्टॉरन्टस्, हॉटेल्स असं काय काय गृहीतच असतं. त्यामुळेच कदाचित, ह्या गोष्टी कृषीपर्यटनातही शिरकाव करू पाहताना बऱ्याच ठिकाणी दिसतं. हळूहळू ती केवळ सधन शेतकऱ्यांचीच मक्तेदारी होण्याची भीती निर्माण झाली आहे. तसंच इथं येणारे पर्यटकही सधनच... पण खरं तर कृषीपर्यटनाला हे अपेक्षित नाहीच मुळी...

किंबहुना कृषीपर्यटन क्षेत्रं वर्षभर सुरू न ठेवता केवळ हंगामीच असावीत, असं मला वाटतं. म्हणजे शेतात मका आला किंवा हुरडा आला की गणेशने मला कळवायचं. मग तशी जाहिरात करून मी पर्यटकांना तिथं घेऊन जाईन. त्यामुळे गणेशला शेतीची कामंही नीट करता येतील आणि हा जोडधंदाही सुरळीत चालेल.'' जेवण कधीच आटोपलं होतं. गणेशनं मळ्यातूनच तोडून आणलेली गोड पपई खात आम्ही सावलीत बसलो होतो.

जरा वेळ आराम झाल्यावर, कांदा कसा काढायचा? ऊस कसा कापायचा? असले प्रशिक्षणही आम्हाला मिळालं. स्वत: तोडलेला ऊस चाखण्याची मजाच निराळी! संध्याकाळ झाली होती. पुन्हा वातावरणात गारवा पसरू लागला. अंधारापूर्वी पुण्यात पोचलेलं बरं म्हणून काहीशा अनिच्छेने आम्ही तिथून निघालो. गणेश बऱ्याच दूरपर्यंत आम्हाला सोडायला आला होता. सोबत पपई, ऊस, कांदा, मिरच्या असं बरंच काही त्यानं आम्हाला दिलं. मळा सोडण्यापूर्वीच गणेशला त्याची पूर्ण रक्कम अगदी रोख मिळाली होती. परतीच्या वाटेवर जेजुरीला थांबून चहा घेताना, तिची खंत अन् भविष्यातील स्वप्न याबद्दल रसिका सहज बोलून गेली.

''बऱ्याच शेतकऱ्यांना 'कृषीपर्यटन' त्यासाठी मिळणारी आर्थिक मदत किंवा त्याचं एकंदरीत महत्त्व याबद्दल फारशी माहितीच नाही. तसंच पर्यटकांपर्यंत पोचायचं कसं? हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा. एखादं केंद्र कसं उभारायचं, कसं चालवायचं? ह्याबाबतही योग्य मार्गदर्शन त्यांना मिळत नाही. अनेक केंद्रांवर पैसे थेट शेतकऱ्याला मिळतच नाहीत. म्हणून ह्या शेतकऱ्यांपर्यंत ही माहिती पोचवायची आणि शेतकरी व कृषीपर्यटक यांच्यातील दुवा म्हणून काम करायचं, असं मी ठरवलं.

खरं तर ही कृषीपर्यटनाची संकल्पना मला खूप पुढं न्यायची आहे. ह्या माध्यमातूनच धान्यं, फुलं इत्यादींच्या अनेक दुर्लक्षित पण महत्त्वाच्या वन्य जातींचं संवर्धन करणं शक्य आहे. म्हणजे ह्या वन्य जातींचं महत्त्व पर्यटकांना पटवून द्यायचं. पर्यटकांमार्फतच ह्या जातींची मागणी वाढवून लागवडही वाढवायची... म्हणजे ह्या जातींचं सहज संवर्धन करता येईल. 'हॉर्टीकल्चर' आणि 'लँडस्केपींग'चे अनेक प्रयोग कृषीपर्यटनाच्या माध्यमातून यशस्वी करता येतील. हेच खरं माझं स्वप्न आहे.'

हे सांगताना तिच्या डोळ्यांमध्ये थकवा स्पष्ट जाणवत होता.

''कसं वाटतंय तुला आता?'' सहजच मी विचारलं.

''खरं सांगू... दोन्ही हात पसरून, डोळे घट्ट मिटून, अशी एक उंच उडी मारावीशी वाटते.''

खरं तर माझ्या मते, जेऊरचा हा प्रकल्प म्हणजे एका विद्यार्थिनीची एक मुक्त उडीच आहे, नाही का?...

---


**नीलेश मोडक**

Email:neeleshdmodak@jmail.com

Mob. : 9975057347


---

(पुणे येथील गरवारे महाविद्यालयात एम.एस्सी. (मायक्रोबायलॉजी) करीत असलेल्या या तरुणाचे हे सदर महिन्यातून एकदा प्रसिद्ध होईल. **– संपादक**)

# नववर्षाच्या वेशीवर



माधव गवाणकर



ऊन फार दुरून येते. ते सोनेरी अंगाचे ऊन दगडी द्रोणीच्या पाण्यातही उतरते. चिमुकल्या गप्पी माशांनाही 'जीवन'सत्त्व देते. त्यांच्या सप्तरंगांना झळाळी प्राप्त होते. आपणही अंतरंगांना असाच उजाळा द्यायचा असतो.

दापोलीतील उंच उंच झाडे पाहताना मला माझे ज्येष्ठ स्नेही रवींद्र पिंगे यांची आठवण येते. २००९ ते पाहू शकले नाहीत, पण त्यांनी आयुष्यात जे भले-बुरे पाहिले, ते त्यांनी लिहून ठेवले. मुंबईच्या 'आकाशवाणी भवना'च्या पाचव्या मजल्यावर जेव्हा त्यांचे राज्य होते, तेव्हाही त्यांनी बढाया मारल्या नाहीत. ज्ञानमाता दुर्गा भागवतांपासून 'बोलू ऐसे बोल' लिहिणाऱ्या वनितामंडळ विभागाच्या लीलावती भागवतांपर्यंत अनेक सुविद्य महिलांशी, उमाकांत ठोमरेंसारख्या चोखंदळ संपादकांशी, 'ग्रंथवार्ता' या ध्वनिसदरासाठी पुस्तके पाठवणाऱ्या प्रकाशकांशी, माझ्यासारख्या पोपटपंची करणाऱ्या निवेदकांशी, गायक गंधर्वांशी, नटमंडळींशी, हरहुन्नरी कलावती नीलम प्रभूंशी, सुहासिनी मुळगावकरांशी, एस.एन.डी.टी.तील डॉ. कांचनमाला हरमळकरांशी, गीतकार प्रवीण दवणेशी... शेकडो रसिकांशी, पुस्तकविक्रेत्यांशी, रत्नागिरीच्या स्मिता राजवाडेंशी पिंग्यांनी शुद्ध स्नेह ठेवला. त्यांचे मैत्र त्यांच्या अगणित पत्रांमधूनही पसरले आहे. पिंगे आमच्यापाशीच आहेत! मंगेश पाडगावकर नि पु.लं.चा सहवास मिळाल्यामुळे. खळ्यांचे म्युझिक आमच्या खळ्यात मळ्यात येण्यापूर्वी पिंग्यांनी ऐकल्यामुळे, फडफडीत पापलेटासारखे ताजे पुस्तक त्यांच्या पुढ्यात आधी पडत असल्यामुळे रवींद्र सांस्कृतिक समृद्धीचे धनी झाले. त्यांनी आमच्याशी हितगुज केले आणि अनेक किस्से मला सांगून ठेवले. 'हे लिहायचे नाही हां' अशी गोड तंबीही ते देत असत. ते किस्से सर्वस्वी खरे असतील, असेही नाही. पण मजेदार, अजब असत. कोण किती पाण्यात उभा आहे ते पिंगे ओळखत. एका प्राध्यापकाबद्दल ते म्हणाले, 'हा XXXX स्पार्क दाखवतच नाही. मी याला भाषणे ठोकायला बोलावतो, कारण रेडियोटॉक कुणी ऐकत नाही, पण या माणसाचे शेवटी काय

उरणार. रेडियोतले सगळे हवेवर विरून जाणार...' रवींद्र पिंगे मात्र त्यांच्या लेखनातील लालित्यासह पुरून उरले. विरून, वितळून गेले नाहीत. उलट, आम्हीच त्यांच्या लेखनाने विरघळत गेलो.

२००८ला निरोप देताना वाटले. आयुष्य किती क्षणभंगुर असते. फुलपाखरू येते आणि बागडून जाते. तेव्हा कुणावर कसलेही आरोप न करता ते आनंदात घालवावे. आपण बरे नि आपली अभ्यासिका बरी. मास्तराने एक 'तासिका' घेतली, तरी त्याचा आनंद विद्यार्थ्यांना दिवसभर पुरला पाहिजे. काही प्राध्यापक स्वत:बद्दलच वर्गात बोलत सुटतात. मग मुलेही ते येण्याआधी पळून जातात आणि कॅन्टीनमध्ये सिनेमाच्या गप्पा मारत बसतात. 'दोस्ताना' फालतू आहे, त्यापेक्षा 'फॅशन' बरा आहे आणि मराठी माणसाने काढलाय, असेही ऐकू येते. मुलामुलींच्या गप्पा मी मुद्दाम ऐकतो. त्यातून नवे जग कळते.

नव्या वर्षाचे स्वागत करताना मी निराश अजिबात नाही. कारण मला प्रिय असलेले बुद्धिवादी लोक प्रत्येक जिल्ह्यातच नव्हे, तर तालुक्यात आहेत. आसपास 'पाचोळा' पडत असताना आपापली बंगली ते मठीसारखी राखून आहेत. त्यांच्याशी चर्चा करायला मी छोट्या छोट्या गावाकडे जातो. चिपळूण तालुक्यातही, कोळकेवाडीची राजन इंदुलकरांनी त्यांच्या साथींसह चालवलेली आदिवासी मुलांची शाळा बघून आलो. धनगर आणि कातकरी मुले त्यांचा दिनक्रम गाण्यातून सांगत होती. धुके ओलांडून आम्ही त्या शाळेकडे गेलो. तरुण मुलांना मुद्दामच ती शाळा बघायला मी नेले. 'लेखक म्हणजे कोण रे?' मी त्या मुलांना विचारले. 'जो धडे (पाठ) लिहितो, तो', एकाने उत्तर दिले. त्या बालकांना पाठ्यपुस्तक माहीत होते, पण निसर्गाचे केवढे तरी व्यापक, विशाल पुस्तक त्यांच्या आसपास पाने उघडून वाऱ्यावर फडफडत आहे व त्या बुकाशी त्यांची खास दोस्ती आहे. वर्ष संपता संपता कोळकेवाडीची शाळा बघून माझ्या त्या दिवसाचे सार्थक झाले!



नव्या वर्षाचे ऊन पुस्तकांच्या काचकपाटावरही पसरते. माझ्या घरी चोरीमारीचे भय नाही. 'समाजस्वास्थ्य'पासून 'अमृत'पर्यंतचे अंक नि विचार करावयास लावणारे ग्रंथ पळवून चोरटा करणार काय? तेव्हा माझी ग्रंथसंपत्ती सुखरूप आहे.

जुने कोकण कसे होते, काय बदल झाले ते विचारायला माझ्याकडे एक फ्रेंच कवी येऊन गेला. त्याला मी 'श्यामची आई'ची व्हीडिओ कॅसेट दिली. काही संदर्भ इंग्रजीत सांगितले. जुन्या कोकणातील जीवनशैली विविध अंगांनी 'श्यामची आई'मध्ये दिसते. दापोलीतील मंडलिक कुटुंबाच्या मदतीने 'श्यामची आई'चे चित्रण झाले. आचार्य अत्र्यांची टीम मंडलिकांकडे उतरली होती, असे जुने ग्रामस्थ सांगतात. 'श्यामची आई'ची एक चित्रप्रत मी युरोपात त्या रसिक, जिज्ञासू माणसाबरोबर पाठवू शकलो. छोट्या छोट्या गोष्टींत किती आनंद असतो! माझ्या गॅलरीतल्या सदाफुलीसारख्या साध्या साध्या गोष्टीसुद्धा रोजच उमलत असतात.

आपणही न घाबरता, न रडता फुलत-बहरत राहिले पाहिजे.

ज्येष्ठ माणसेही सरत्या वर्षी मी उत्साहात पाहिली. मालाडच्या प्रभाताई तुळपुळेसुद्धा त्यांच्या उपक्रमांबद्दल माझ्याशी फोनवर उत्साहात बोलत होत्या. पुण्यातील 'पेंडसे ट्रस्ट'च्या निर्मलाताई माझ्याकडून वेगवेगळे उपक्रम करवून घेत राहिल्या. कधी बालकथाकथन, कधी निबंध कार्यशाळा. निर्मला पेंडसे हल्लीच युरोप बघून आल्या. किती उत्साह! केवढा आनंद! तोही ऐंशी वर्षांचे आयुष्य ऊनपावसासह पाहिल्यावर.

ही अशी चैतन्य घेऊन वावरणारी काटक माणसे पाहिली की, मी 'बुजगावणे' बनूच शकत नाही. माझ्यातला 'माणूस' नव्या वर्षी अधिक जागा होतो आणि शुद्ध पाण्याचे झरे शोधण्यासाठी भटकू लागतो...

**– माधव गवाणकर**
वडाचा कोंड, दापोली शहर, जि. रत्नागिरी – ४१५७१२. दूरध्वनी : ०२३५८-२६७११०.



मंगेश नाबर

# २००८ या वर्षात 'साधना'ने वाचकांना काय दिलं? (भाग : १)

**'साधना'च्या जुन्या-जाणत्या वाचकांपैकी एक महत्त्वाचे नाव - मंगेश नाबर. मागील तीन वर्षे त्यांनी 'साधना' अंकांचा वर्षभराचा आढावा नेमकेपणाने घेतला होता. या वर्षी त्यांनी दीर्घ आढावा परिश्रमपूर्वक घेतला आहे, तो तीन भागांत क्रमश: प्रसिद्ध करीत आहोत.**

**- संपादक**

२००८ हे 'साधना' साप्ताहिकाचे ६१ वे वर्ष. हीरकमहोत्सवाच्या धामधुमीतून बाहेर आलेल्या 'साधना' साप्ताहिकाचे अंतरंग कसे असेल, ते किती बहरलेले असेल, त्यात नवीनतेची कसकशी भर पडलेली असेल याची उत्सुकता माझ्याप्रमाणे तुम्हा सर्व वाचकांना लागली असणार यात तीळमात्र संशय नव्हता आणि संपादकांनी, 'साधना'च्या ५ जानेवारी २००८च्या अंकात यंदा 'साधना'मध्ये कोणकोणती सदरे असतील, काय विशेषांक असतील याचा दोन पानी विस्तृत आलेख मांडला होता. त्याला अनुलक्षून २००८ मधील 'साधना'च्या अंतरंगाचा आढावा घेण्याचा मानस आहे, पण या साप्ताहिकाचा आवाका पाहता असा विस्तृत व संपूर्ण आढावा घेणे अशक्य आहे. यंदाच्या वर्षातील एकंदरीत साहित्यातील आवडनिवडीचा हा लेखाजोखा म्हणजे एका सामान्य वाचकाच्या नजरेला जे दिसले, जे मनाला भिडले, त्याचा हा धावता आलेख.

**प्रतिसाद :**

सर्वप्रथम 'साधना'च्या सर्व वाचकांना सलाम! कारण यंदाचे वर्ष हे 'साधना'वर खरोखर मनापासून प्रेम करणाऱ्या वाचकांचे होते, हे त्यांच्याकडून येणाऱ्या लहानमोठ्या पत्रांच्या प्रेमळ भडीमारावरून आणि त्याला संपादकांनी दिलेल्या पानभर खुलासेवजा उत्तरावरून (५ जुलै) सिद्ध झाले. यंदा 'साधना'च्या काही अपवाद वगळता प्रत्येक अंकात वाचकांच्या सखोल व जागरूक प्रतिसादाला भरपूर जागा देण्यात आली होती. छोट्यामोठ्या आकारातली 'साधना'तील विचारांना साथ देणारी तसेच त्याविरुद्ध बेधडक टीकाप्रहार करणारी पत्रेही यंदा होती. डॉ.राहुल वसंत रेवले या सातारास्थित एका तरुण वाचकाचे समाजवादाच्या विरोधी मतप्रदर्शन करणारे पत्र साधनात (१० मे) आले आणि त्यावर विचारमंथन करणारी समर्पक पत्रे प्रसिद्ध झाली आणि रेवले यांना आपली चूक प्रांजळपणे मान्य करावी लागली. २६ नोव्हेंबरच्या मुंबईवरील अतिरेक्यांच्या हल्ल्यानंतर चिदानंद खण्णू यांनी व्यक्त केलेल्या संतप्त भावना कुणाही देशप्रेमी नागरिकाच्या मनात येतील अशा होत्या. साधनाच्या व्यासपीठावरील ही मुक्त चर्चा समतोल व संयमी विचारांचे महत्त्व सध्याच्या काळात किती आहे, हे सिद्ध करणारी आहे. म्हणून यंदा ज्या इतर वाचकांची पत्रे - प्रतिसाद, वादसंवाद आणि चर्चा-मंथन सदरात प्रसिद्ध झाली, त्यांची नावे पुढीलप्रमाणे -

स.ह. देशपांडे (१२ व १९ जाने.), श्याम केळकर, प्रभा तुळपुळे, दत्ता वान्द्रे (१२ जाने.), पन्नालाल सुराणा (२६ जाने.), संजय जोशी व अवधूत परळकर (२ फेब्रु.), विद्याभाऊ पटवर्धन (९ फेब्रु.), दत्तप्रसाद दाभोलकर (१६ फेब्रु.), पम्मी खांडेकर, विद्याधर म्हैसकर, लीलाधर हेगडे (१ मार्च), सुभाष आठले (८ मार्च), पुरुषोत्तम खांडेकर, अमरजा नेरूरकर (१५ मार्च), देवदत्त दाभोलकर, वा.डो. बाकडे, हमीद दाभोलकर (५ एप्रिल), रमेश आगाशे (२६ एप्रिल), पुरुषोत्तम शेठ (३ मे), माधव दातार, प्रभा तुळपुळे, शफी मुल्ला, गौरी सामंत, डॉ.श्रीकांत परळकर (२४ मे, ६,२० डिसें.) वि.रा. भागवत, अनिल द. तिकोनकर, का.वा. शिरसाठ (३१ मे), प्रभाकर गुप्ते, केशव फडणीस (७ जून), दशरथ जंगमाडे, दादा हसबनीस, रमानाथ सावंत, शाहीर तुळशीराम जाधव (२८ जून), भामिनी दाते धारवाडकर, शोभना शिलोत्री, परमेश्वर कोडकणी-कोइमतूर, डॉ.अ.ना. पातूरकर (५ जुलै), विकास देशपांडे-बॉस्टन, अरविंद निगळे (१२ जुलै), स्वानंदी वडगावकर, सुधाकर सोनावणे, प्रतिभा आळतेकर,

मनोहर जोशी (१९ जुलै), आरोहण पेणकर-इस्रायल, पन्नालाल सुराणा, डॉ.भालचंद्र कानगो, शेखर गजभार (२६ जुलै), रमेश आगाशे (२ व ९ ऑगस्ट), दत्ता वान्द्रे, मंगेश नाबर, नारायण नारकर, सुलोचना वाणी (९ ऑगस्ट), वि.शं. गोखले, अंबिकाचरण विरुकोंडा, वि.शं. चौघुले, अमेय रानडे, दामोदर भानुशाली-भोपाळ, मोहनदास मेहता-भावनगर, विनायक देशपांडे (३० ऑगस्ट), डॉ.अनंत फडके, रमेश आगाशे, दिलीप कामत (१३ सप्टें.), संतोष बुरंगे, हेमांगी जोशी, मुरली पाठक (२० सप्टें.), फुलचंद सांकला, पन्नालाल सुराणा (२७ सप्टें.), पद्मा चिकूर, वृन्दाश्री दाभोलकर (११ ऑक्टो.), सर्वोत्तम ठाकूर (२२ नोव्हें.), भालचंद्र राजे (२९ नोव्हें.), कमलाकर गोटखिंडी, चिदानंद खण्णू (१३ डिसें.), डॉ.दत्ताजी भापकर (२० डिसें.)

**सदरे :**

विविध विषयांवरील सदरे म्हणजे साधनाची एकेक दालने आहेत. ताज्या घटना मग त्या राज्य, राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील असो, त्यावरील विश्लेषण पहिल्या दालनात आपल्याला मिळत असते. **गोविंद तळवलकरांचे** या वर्षभरात २० लेख त्यांच्या 'परामर्श' या सदरात आले. लोकशाही समाजवादाची वाटचाल या शीर्षकाने त्यांनी लिहिलेले चार लेख हे प्रा.डोनाल्ड ससून यांच्या 'वन हन्ड्रेड इयर्स ऑफ सोशलिझम' या ग्रंथाच्या अनुषंगाने लिहिले होते. अमेरिकेत जेव्हा अध्यक्षीय निवडणुकीचे वेध लागले, नंतर प्रचाराचे ढोल वाजत होते, शेवटी निवडणुकीचा निकाल लागला, तेव्हा तळवलकरांनी त्याचा आपल्या सदरात वेधकतेने परामर्श घेतला. मॅकेन व ओबामा यांची चढती कमान (२३ फेब्रु.), ओबामा लाट अडली (१५ मार्च), अमेरिकेत जेव्हा इतिहास घडतो (१३ सप्टें.), नेतृत्वहीन अमेरिका (११ ऑक्टो.), ओबामांचा विजय - देशोदेशींच्या प्रतिक्रिया (२९ नोव्हें.), ओबामा यांचे मंत्रिमंडळ (२७ डिसें.) हे तळवलकरांचे लेख नेमक्या परिस्थितीचे दर्शन घडवणारे होते. याशिवाय देशव्यापी असे शेतीविषयक धोरण स्वामीनाथन आयोगाने जाहीर केल्यावर गोविंदरावांनी 'सावकारी पाश' (२९ मार्च) हा लेख लिहून या धोरणातील त्रुटींकडे लक्ष वेधले. महाराष्ट्रातील राजकीय बजबजपुरीकडे त्यांचे सतत लक्ष होते, त्यातून 'कर्नाटक नंतर महाराष्ट्र' (२८ जून), महाराष्ट्रात सौरशक्तीचा उपक्रम का अंगिकारला जात नाही, याचा प्रश्न पडून त्यांनी 'सूर्य उगवला, प्रकाश पडला...' हा मर्मभेदी लेख १२ जुलैच्या अंकात लिहिला. 'अशांत तिबेट' हा त्यांचा १९ एप्रिलच्या अंकातील लेख कम्युनिस्ट पक्षातील एकाधिकारशाही व लामाशाही यांचे वास्तव दाखवणारा होता. तळवलकर अमेरिकेत वास्तव्य करून असल्याने आणखी एक लाभ वाचकांना झाला. तेथील 'वॉल स्ट्रीट जर्नल' या वृत्तपत्रात त्यांना मुंबईच्या 'आरे' दुग्ध योजनेच्या दुर्दशेवरील वार्तापत्र आढळले. सामान्य मुंबईकरांसाठी आणलेल्या या कल्याणकारी योजनेचा प्रारंभ ज्या तळवलकरांनी आपल्या डोळ्यांनी पाहिला होता, त्याचा पार बोजवारा उडाल्याचे त्यांना झालेले दु:ख त्यांनी याच तिबेटच्या लेखासोबत व्यक्त केले. नेपाळ या आपल्या शेजारी देशात जो सत्ताबदल झाला, त्यावरील 'नेपाळमधील प्रचंड उलथापालथ' (३ मे), 'नेपाळी पक्षीय राजकारण' (१० मे), हे तळवलकरांचे सर्वांगीण वेध घेणारे दोन लेख होते. स्टीव्ह कोल यांच्या बिन लादेन्स या पुस्तकाच्या अनुषंगाने तळवलकरांचा 'बिन लादेन कुटुंबाचे आर्थिक साम्राज्य' हा प्रदीर्घ लेख ३१ मेच्या अंकात होता. 'लोकमान्य टिळक यांच्या कारावासाची शताब्दी' (१९ जुलै), रॉब गिफर्ड यांच्या 'चायना रोड' या ग्रंथाच्या अनुषंगाने 'चीनचे खरे दर्शन' (९ ऑगस्ट), अणुकरार तडीस नेण्यासाठी मनमोहनसिंगांचे निकराचे प्रयत्न होत असताना 'हंसे मुक्ता नेली' (२७ सप्टें.), तर देशात दहशतवादाचे थैमान माजले असताना 'दहशतवादाचा विस्तार' (१३ डिसें.) असे हे तळवलकरांचे लेख वाचताना मटामधील त्यांच्या अग्रलेखांची आठवण झाली.

तळवलकरांच्या जोडीला यंदा साधनाला परिचित नसलेले एक विचारवंत लेखक **अशोक राजवाडे** आपल्या 'कुंपणांपलीकडे' या सदरातून भेटत राहिले. जातीची, धर्माची, भाषेची, प्रदेशाची, कार्यक्षेत्राची आणि विचारांची कुंपणे ओलांडून जे काही दिसते ते देण्याचा निर्धार हे पाक्षिक-सदर सुरू होण्यापूर्वी व्यक्त केला होता. तरी प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय संदर्भातले विषय घेण्याचा राजवाडेंचा मानस होता. विज्ञान, कला, राजकारण, तंत्रज्ञान यांपैकी कोणतेच विषय वर्ज्य नसतील, असे त्यांचे निवेदन होते. या वर्षात त्यांचे १३ लेख आले होते. जागतिकीकरणाचा सामान्य माणसावर होणारा परिणाम त्यांच्या ५ जानेवारीच्या लेखात जाणवणारा होता. 'लिबरेशन थिऑलॉजी'वरील त्यांचे तीन लेख (५, २६ जुलै व ९ ऑगस्ट) वाचकांना एका वेगळ्या विषयाकडे नेणारे होते. तरी राजवाडे यांचे हे सदर इतक्या थोड्या लेखांमुळे 'साधना'मध्ये म्हणावे तितके रुळू शकले नाही, हे खेदाने म्हणावेसे वाटते. राजवाडे यांनी प्रचलित घटनांवर आपले विचार मांडावेत.

गेल्या वर्षी ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र पिंगे यांचे 'पाटाचे पाणी' हे सदर होते. पिंगे यांनी वयोमानाप्रमाणे वाचकांचा निरोप घेतल्यानंतर प्रतिथयश लेखक **सुभाष भेंडे** यांनी 'कुळागर' या नावाने साहित्य-संस्कृती निर्मितीचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन 'साधना'तून घडवले. महाभारत (५ एप्रिल), स्वत:चा चेहरा असलेली कविता (३ मे), एका युगाचा अंत (७ जून), कवींचा कवी (६ सप्टें.), उत्तुंग (११ ऑक्टो.) या सर्व लेखांतून भेंडे यांनी आपल्या लेखणीतून त्यांना दिसलेले साहित्य क्षेत्रातील दिग्गज वाचकांसमोर वैशिष्ट्यपूर्ण शैलीद्वारा उभे केले.

**राजन गवस** हे अशाच प्रकारे साहित्य दिंडी पुढे नेणारे समर्थ लेखक. त्यांना तर 'कैफियत' मांडायची होती - माणसांची, प्राण्यांची, निसर्गाची... सर्वांचीच. पहिल्याच लेखाने गवस यांनी वाचकांच्या मनाचा ताबा घेतला - चिमण्या (५ जाने.). तसाच दुसरा लेख त्यांनी गावात आपल्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर नाभिकाचे काम करणाऱ्या शांताबाईची कैफियत (९ फेब्रु.) मांडली. त्यानंतर मुलांनी 'गुर्जी' संबोधणे बंद करण्याचा आटापिटा करणाऱ्या एका शिक्षकाची हकीकत

(२३ फेब्रु.), बुडालेल्या ग्रामीण पतसंस्थेमुळे सर्वस्व गमावून बसलेली झेंडाबाई (८ मार्च), कर्जापायी जमीन विकणारा शुक्राचार्य (५ एप्रिल), शंकर सुतार (२६ एप्रिल), अशा अनेकांच्या कैफियती सादर करून राजन गवस वाचकांना थक्क करतात. 'या लोकवाद्यांचं शास्त्र शोधावं, असं कुणालाच कसं वाटत नाही' (७ जून) हा राजन गवस यांच्या शैलीतून उतरलेला लेख त्यांच्या शोधक वृत्तीचे द्योतक आहे. मध्यंतरी एका गावातील श्रीधर कांबळे या विद्यार्थ्याने आपली 'नासा'त निवड झाल्याचे भासवून थेट राज्याच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत अनेकांना फसवले. या विद्यार्थ्याला असे वागण्यास कोणी प्रवृत्त केले, हा गवस यांचा लेख (२८ जून) विचार करायला लावणारा होता. यानंतर राजन गवस यांनी कैफियत प्रदीर्घ कालखंडानंतर २० डिसेंबरच्या अंकात आली. पक्षीय राजकारणामुळे मृत देहाला अग्नी देण्यासही आडकाठी होऊ शकते, ही त्यांनी नोंदवलेली कैफियत लक्षात राहील अशी आहे.

यंदा 'साधना'तून आपल्या लेखणीने भारून टाकणारे आणखी लेखक होते, **आसाराम लोमटे**. त्यांच्या ग्रामीण ढंगाच्या लेखणीचा बाज काही औरच आहे. त्यांनी 'तळटीपा' सदरात शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचाच फोडली. सावध ऐका पुढल्या हाका (१२ जाने.), दु:ख देखणे तुझे (१६ फेब्रु.), पाणी कुठवर आलं गं बाई... (२६ एप्रिल), ऊस गोड झाला म्हणून (१७ मे), राबणाऱ्यांच्या गर्दीतला गर्दीश (७ जून), तो पाऊस कसला (७ जून), देवा ह्याही देशात पाऊस पाड (२६ जुलै) हे त्यांचे लेख म्हणजे अस्सल अनुभवाची खणखणीत नाणी आहेत. यानंतर या परभणीच्या लेखकाचे सदर दिसले नाही, याचे नवल वाटते.

माझ्यासारख्या नित्य नवे शोधणाऱ्या वाचकाला मुग्ध करणारे साईनाथ पाचारणे आणि राजा शिरगुप्पे. त्यांनी अनुक्रमे 'कानगोष्टी' आणि 'न पेटलेले दिवे' या सदरातून उपेक्षित ग्रामीण जीवन वाचकांसमोर आणले.

उल्लेखनीय अशी इतरही सदरे आहेत. वसंत आबाजी डहाके यांचे 'चौक', संतोष शेणई यांचे 'साहित्य शिफारस', सतीश काळसेकरांची 'वाचणाऱ्याची रोजनिशी', वैशाली रोडे यांचे 'परिघावरून' आणि हेरंब कुलकर्णी यांचे 'तिरकस चौकस'.

यंदा ५ जुलैच्या अंकात साधनाच्या वाचकांचे लाडके लेखक अवधूत परळकर यांनी वाचकांचा अकस्मात निरोप घेतला. गेली ६-७ वर्षे 'जनअरण्य', 'माध्यमकल्लोळ', 'सत्यातून साहित्याकडे' या पाक्षिक-सदरातून आपले निर्भीड विचार परळकर मांडत होते. त्यांनी 'साधना'चा अचानक निरोप घेतला असला, तरी यापुढे अधूनमधून त्यांचे लेखन 'साधना'त यावे.

८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिलादिनानिमित्त 'साधना'तून विद्या कुलकर्णी यांनी महाराष्ट्र, हरियाणा, ओरिसा, उत्तरांचल आणि मध्यप्रदेश या राज्यांतील धडाडीच्या महिलांचा करून दिलेला परिचय (८ मार्च) उत्साहवर्धक होता.

'बालसाधना' हे मुलांसाठी असलेले सदर अवधूत डोंगरे सादर करत होते. डॉ.प्रकाश जोशी यांची 'गणित म्हणजे काय रे काका' ही गणित विषय सोपा करून देणारी लेखमाला बारा लेखांद्वारे प्रसिद्ध झाली. शालेय विद्यार्थी व शिक्षकांना ती किती उपयोगाची वाटली, हे कळले तर बरे होईल. हे व असे लेखन आता यापुढे 'कुमारसाधना' या सदरात प्रसिद्ध होत आहे. अत्यंत लहान मुले व कुमारवयाची मुले यांच्या वयातील फरक जाणून घेऊन केलेला हा बदल योग्य वाटला.

'नोकरशाईचे रंग' ही ज्ञानेश्वर मुळे यांची लेखमाला यंदा फक्त तीन लेखांपुरती प्रसिद्ध झाली होती. परंतु आता त्या गाजलेल्या व रंगलेल्या लेखांचे संकलित पुस्तक 'साधना प्रकाशना'कडून प्रसिद्ध झाले आहे. 'व्यासपीठ' या तीन किंवा अधिक लेखांच्या सदरात यंदा संजय जोशी, अच्युत गोडबोले, डॉ. अभिजित वैद्य आणि रझिया पटेल यांना आपली भूमिका मांडण्याची संधी मिळाली होती आणि ती त्यांनी अगदी व्यवस्थित पार पाडली.

साने गुरुजींचे एक लाडके शिष्य यशवंत. ब. क्षीरसागर यांनी गुरुजींना लिहिलेले एक पत्र सर्वत्र दाद मिळवून गेले. यशवंत क्षीरसागर, श्रीरंग वरेरकर यांसारख्या साने गुरुजींच्या काळातल्या सेवाभावी कार्यकर्त्यांनी असे अधूनमधून लिहावे असे सुचवावेसे वाटते.

शेखर गजभार यांनी महेश माळी या एका दुर्दैवी मुलाच्या आजारपणाचे वृत्त (२८ जून) वाचकांच्या कानावर घातल्यावर त्याला वाचकांकडून चोहोबाजूंनी मिळालेली आर्थिक मदत 'साधना'चे समाजातील अढळ स्थान दाखवते.

मराठीतील एक बुजुर्ग लेखक यशवंत कर्णिक यांच्या मुलाखतीवर आधारित एक लेख कर्णिक यांच्या ८३व्या वाढदिवसाच्या निमित्ताने 'साधना'मध्ये (१९ जुलै) आला होता. नंतर खुद्द यशवंत कर्णिक यांनी या मुलाखतीत उल्लेख झालेल्या विजय तेंडुलकरांच्या अविस्मरणीय भेटीचा सविस्तर वृत्तांत (२२ नोव्हें.) सादर करून वाचकांना एक वेगळाच आनंद दिला.

यंदा ५ ते ७ डिसेंबर या काळात 'साधना'ने आयोजित केलेले 'साधना साहित्य संमेलन' हे कादंबरी या साहित्य प्रकाराला वाहिलेले होते. संमेलनाला अध्यक्ष नव्हता, पण रंगनाथ पठारे यांचे बीजभाषण झाले. चर्चा, कादंबरीकारांशी गप्पा, वाचक-लेखक संवाद, प्रश्नमंजूषा स्पर्धा या उपक्रमांमुळे 'साधना'चे हे पहिले संमेलन मराठी साहित्यविश्वाला खऱ्या अर्थाने भावले. असे साहित्य संमेलन दरवर्षी होणार आहे आणि ते वेगवेगळ्या साहित्यप्रकाराला वाहिलेले असेल, ही आनंदाची बाब आहे.

निमित्त मराठीच्या स्वाभिमानाचे - मुद्दा सार्वजनिक विवेकाचा ही सुहास पळशीकर यांची लेखमाला ६, १३, २० व २७ डिसेंबर या चार अंकांतून प्रसिद्ध झाली.

(क्रमश:)

---

**- मंगेश नाबर**
mangeshnabar@gmail.com
Tel. : 022-24135755

---

प्रतिसाद

## अंतुलेंचे खरेच काही चुकले का?

अंतुले जे म्हणाले त्यामागच्या वेदना व तर्कशास्त्र लक्षात न घेता, त्यांच्यावर खूप आगपाखड झाली. साधना (१७ जानेवारी) मधील रमेश दोंदे यांचे 'अंतुले यांची हकालपट्टी न करणे म्हणजे अल्पसंख्यांकांच्या देशभक्तीबद्दल शंका घेणे!' हे पत्र म्हणजे तर अगदी कहर झाला.

अंतुलेंचे खरेच काही चुकले का? हिंदुत्ववादी संघटना हेमंत करकरे यांच्या कामात व्यत्यय आणून त्यांना प्रचंड यातना देत होत्या. राजनाथसिंग यांनी तर जाहीरपणे 'करकरे यांचीच नार्को टेस्ट करा' अशी मागणी केली होती! एका हिंदुत्ववादी मान्यवर वृत्तपत्राने त्यांना 'महात्मा हेमंत करकरे' असे संबोधून या महात्म्यांना मार्गावर आणणारे 'क्रांतिवीर' या देशात आहेत याची आठवण करून दिली होती. त्यांच्या निषेधार्थ महाराष्ट्र बंद करणार होते, त्यांना धमकी देणारे दूरध्वनी येत होते. करकरे यांनी एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत या 'सर्वांमुळे आपण प्रचंड मानसिक तणावाखाली आहोत' असे सांगितले होते. आणखी एक अजिबात लक्षात न घेतलेली गोष्ट आहे, 'हिंदू व्हॉइस' या मासिकाने डिसेंबरच्या अंकात चौकटीत एक मजकूर छापला आहे. मजकूर असा 'हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे माणसांना त्यांच्या वाईट कृत्यांची शिक्षा पुढील जन्मात वा याच जन्मात मिळते. प्रज्ञासिंगसारख्या वंदनीय साध्वीला त्रास दिल्याबद्दल करकरे यांना मृत्युदंड मिळाला आहे'. 'हिंदू व्हाइस'च्या अग्रलेखात सर्व सरसंघचालकांचे वारेमाप कौतुक केलेले आहे. मी 'हिंदू व्हाइस' वाचतो. कारण माझे प्रबोधन व्हावे म्हणून, माझ्या एका मित्राने, (जो संघाचा वरिष्ठ अधिकारी आहे) मला तो सुरू केला आहे!

ते असो. दोंदे यांनी 'अंतुले यांनी करकरे यांच्याबरोबरच साळसकर व कामटे यांच्या मृत्यूच्या चौकशीची मागणी का केली नाही' असे विचारले आहे. त्यांनी खरे तर हा प्रश्न नरेंद्र मोदी यांना विचारावयास हवा. कारण हेमंत करकरे यांचा 'वध' झाल्यावर त्यांच्या घरी जाऊन त्यांनी त्यांच्या पत्नीला एक कोटी रुपये देऊ केले, तसा धनादेश घेऊन ते कामटे व साळसकर यांच्या घरी का गेले नाहीत? हिंदुत्ववादी शक्ती हेमंत करकरे यांचा 'वध' झाला असे जरूर म्हणोत. भारतीय जनता त्यांना कायम 'हुतात्मा हेमंत करकरे' म्हणेल आणि एक कोटी रुपयांच्या धनादेशासकट, नरेंद्र मोदी यांना घराबाहेर काढणाऱ्या त्यांच्या वीरपत्नीला 'प्रणाम' करेल.

**दत्तप्रसाद दाभोलकर, 'या', सदर बझार, सातारा.**

## पळशीकरांनी मनसेवर आगपाखड न करता...

सुहास पळशीकर यांचा 'साधना' १७ डिसेंबर २००८ मधील लेख वाचला आणि शब्दबंबाळ झालो. बराच वेळ मी काय वाचतोय ते मलाच कळत नव्हते. हा काही त्यांचा दोष नाही. असे वाचणे माझ्या सवयीचे नाही.

त्यांच्या लेखातून मला समजलेला मुद्दा असा की, 'आपली गाऱ्हाणी, आपले प्रश्न, आपल्या समस्या लोकशाहीमध्ये सनदशीर मार्गाने लोकांपुढे, सरकारपुढे मांडाव्यात. त्या सवडीने, सबुरीने, सलोख्याने मार्गी लावण्याचा, सोडविण्याचा प्रयास करावा. आपल्या समस्या सोडवून घेत असताना इतर प्रश्न निर्माण करू नयेत.'

हे तत्त्वज्ञान म्हणून सांगायला सोपे आहे, पण एवढ्या सहजतेने समस्यांचे निराकरण होते का? मुळात अशा समस्या ऐकल्या व समजावून घेतल्या जातात का? आंदोलने उभी राहतात ती समस्या निराकरणाच्या जाणीवेच्या अभावामुळे. पुण्यात येऊ घातलेल्या 'डाऊ'चे उदाहरण घ्या. 'डाऊ' ही मागासलेल्या देशांत विषारी उत्पादने निर्माण करणारी व विकणारी कंपनी आहे. अमेरिकेत बंदी असलेल्या या कंपनीला केंद्र व राज्य सरकारने मान्यता देताना लोकजीवन व पर्यावरणाला पोषक अशा अस्तित्वात असलेल्या सर्व कायद्यांचे उल्लंखन केले. परिणामी मानवी हक्क व अधिकार यांची पायमल्ली केली. सनदशीर मार्गाने जाणाऱ्या वारकरी आंदोलनाकडे दुराग्रही सरकारने सातत्याने दुर्लक्ष केले. विशेष म्हणजे सर्व प्रसारमाध्यमांनी या कंपनीच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीकडे डोळेझाक करून व या नेक आंदोलनाला कमी लेखून एका परीने कंपनीला व सरकारला सहाय्य केले. वेळप्रसंगी आंदोलकांचा बुद्धीभेदही केला. मग मात्र ग्रामस्थांनी आक्रमक धोरण अवलंबून डाऊ कंपनीचे बांधकाम उद्ध्वस्त केले. या आंदोलनाची धग सहन न होऊन मुख्यमंत्र्यांनी हा प्रकल्प रद्द करण्याचे संकेत दिले व सर्व वारकऱ्यांवरील खटले मागे घेण्याची घोषणा केली. या घडामोडींमुळे कोणता संदेश दिला गेला?

दुसरे उदाहरण बॅ.अंतुले यांचे. जनाब अंतुले विद्यमान केंद्र सरकारमध्ये कॅबिनेट दर्जाचे मंत्री असून त्यांच्याकडे 'अल्पसंख्यांकांचे कल्याण' हे संवेदनशील व जबाबदारीचे खाते देण्यात आले आहे. तरीही त्यांनी लोकसभेत व बाहेर दहशतवादी हल्ल्यात शहिद झालेल्या करकरे यांच्या मृत्यूबद्दल संशय व्यक्त करणारे अतिशय संकुचित, बेजबाबदार व तितकेच राष्ट्रहिताला बाधक ठरणारे विधान

केले. काँग्रेस पक्षाने 'हे त्यांचे मत आहे' असे सांगत आपली जबाबदारी झटकली. विरोधकांनी लोकसभेत व लोकसभेबाहेर त्यांचा तीव्र शब्दांत निषेध केला. अंतुले पाकधार्जिणे व फितुर आहेत अशी संभावनाही करण्यात आली. त्यांच्या राजीनाम्याची मागणी झाली व त्यांनी तो मानभावीपणे दिलाही. खरे तर आपल्या सहाध्यायी गृहमंत्र्यांशी सल्लामसलत करून त्यांना त्यांच्या संशयाचे निराकरण करता आले असते. तसे न करता त्यांनी वादग्रस्त वक्तव्य का करावे हे एक गूढच आहे. एवढा गदारोळ झाला असतानाही ते आपल्या वक्तव्याशी ठाम राहिले. अशा या अवलक्षणी मंत्र्याला एक क्षणही मंत्रिपदावर राहण्याचा नैतिक अधिकार नव्हता. दुर्दैवाने पंतप्रधानांनी त्यांचा राजीनामा स्वीकारला नाही. लोकक्षोभापेक्षा पंतप्रधानांची अगतिकता श्रेष्ठ ठरली. या घडामोडींमुळे कोणता संदेश दिला गेला?

सरकारची समस्यांची समज, जागरूकता, संवेदनशीलता व समस्यांच्या सोडवणुकीसाठी लागणारे मनोबल एखाद्या आंदोलनाची दिशा, व्याप्ती व स्वरूप ठरवीत असते. सरकार राजकीय निर्णय घेत असताना दिसत असले तरी ते आपली राजकीय ध्येयधोरणे वेळीच व स्पष्टपणे मांडताना दिसत नाहीत. अशा अस्पष्टतेमागे सरकारचे राजकीय हीतच दडलेले आहे असे जाणवते. अशी संदिग्ध परिस्थिती असल्याने राजकीय पक्ष आपल्या परीने आपल्या हितासाठी तिचा उपयोग करून घेत असतात. आज तरुण द्विधा मन:स्थितीत दिसतात याचे मोठे कारण हे आहे की, त्यांच्या समस्या व त्यांचे सरकारच्या ध्येयधोरणात न दिसणारे प्रतिबिंब हा इच्छापूर्तीचा संघर्ष टाळण्यासाठी तरुणांचे प्रबोधन होणे आवश्यक आहे.

यापूर्वीही पत्राद्वारे मी पळशीकरांना विनंती केली होती, आजही करतो. पळशीकरांनी मनसेवर आगपाखड न करता भाषावार प्रांतरचना ही संकल्पना व ती महाराष्ट्रात अपयशी का ठरली यावर लेख लिहावा. माझ्यासारख्या वर्तमानपत्री वाचन करून एकांगी विचार करणाऱ्यांना त्याचा फायदा होईल. तसेच तरुणांचे प्रबोधन होऊन जनतेच्या निकोप संघटना बांधण्यासाठी तिचा उपयोग होईल.

**शरद खेडेकर, विहार सोसायटी, खार (प.), मुंबई ५२.**

## तीन गोष्टी ठरवा आणि न विसरता पाळा !

दिवाळी अंकानंतर 'नवी उमेद नवा विश्वास'ची आशा दाखवणारा साधना साप्ताहिकाचा २२ नोव्हेंबरचा अंक व त्यानंतरचे अंक मिळाले. परंतु काही खटकणाऱ्या त्रुटींकडे आपले लक्ष वेधून घेण्यासाठी हे पत्र लिहीत आहे.

२९ नोव्हेंबरच्या अंकात डॉ.प्रकाश जोशी यांनी गणित सोपे करून दिलेली लेखमाला संपली, त्यानंतर लहान मुलांसाठीचा बाल/कुमार साधना हे सदर अदृश्य झाले आहे. नव्या वर्षात आपण हा नवा नियम केला आहे की काय?

३ जानेवारीच्या अंकात भारंभार सदरांची यादी दिलीत, पण १० जानेवारीच्या अंकात राजकीय घटनांवर सारे लेख देऊन साधनाने अंकाचा तोल पार बिघडवून टाकला आहे. बांगलादेशी राजकारणावर आणि जम्मू-काश्मीरच्या निवडणुकांवर दोन दोन लेख? गोव्यात कुणाच्याही ध्यानात न आलेल्या साधारण चित्रपट महोत्सवावर नऊ पाने? पाकिस्तानी सत्ताधीशांचा पुळका येणारा आपला समाजवाद आम्हाला तरी रूचलेला नाही. या देशाचा जन्म व दैनंदिन कारभार भारताच्या द्वेषाशिवाय घडत नाही. ती तर त्यांची कार्यप्रणाली आहे, हे आपल्याला कधी उमजणार बरे? ३ जानेवारीच्या अंकाच्या मुखपृष्ठावर नकाशा कशासाठी दिला आहे ते कळेल काय?

नव्या वर्षाच्या संकल्पात पुढील तीन गोष्टी ठरवा आणि त्या न विसरता पाळा... प्रत्येक अंकात प्रतिसाद आणि बालकुमार साधना, एका विषयावर एकच लेख असावा.

**रमानाथ सावंत, नायगाव, मुंबई १४**

## राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे अधिवेशन

महाराष्ट्र राज्यशास्त्र व लोकप्रशासन परिषदेचे २६ वे अधिवेशन पीपल्स कॉलेज, नांदेड येथे १३ ते १५ फेब्रुवारी २००९ या काळात संपन्न होणार आहे. सदरील अधिवेशनात खालील शोधनिबंधांचे सादरीकरण केले जाणार आहे.

अ. सामाजिक चळवळी, सामूहिक सहभाग आणि भारतीय लोकशाही.

ब. प्रादेशिक असमतोल, समन्याय विकास आणि महाराष्ट्राचे राजकारण.

क. भारताचे परराष्ट्र धोरण आणि बहुध्रुवीय जागतिक राजकारण.

ड. माहितीचा अधिकार आणि सुशासन.

या अधिवेशनात महाराष्ट्रातील विविध महाविद्यांलयातील राज्यशास्त्र व लोकप्रशासन विषयाच्या प्राध्यापकांना सहभागी होता येईल.

अधिक माहितीसाठी : ९९२२६५४४३२ या क्रमांकावर संपर्क करावा.

प्राचार्य- **व्ही. एन. इंगोले**, संयोजक- **प्रा. विठ्ठल दहिफळे**

कुमार साधना

रेणू गावस्कर

# स्वर्ग

स्वर्ग म्हणजे काय, हे सांगण्याची मुलांमध्ये अहमहमिका लागली. विषय हळूहळू पृथ्वीवरच आपण स्वर्ग निर्माण करू शकतो का, या कल्पनेवर आला. मुलांनी पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याची कल्पना एकदम उचलून धरली. मुलं आपापल्या स्वर्गीय कल्पना सांगू लागली.

गोष्ट सांगायची म्हटलं की मोठी गंमत येते. सांगणाऱ्याला आणि ऐकणाऱ्याला सुद्धा. फक्त त्यात एक अडचण असते. जग इतकं मोठं आहे ना, की गोष्ट सांगायची ठरवली तर कोणती सांगायची हा खरा प्रश्न होऊन बसतो. पण एक मात्र नक्की. सगळ्यात छान गोष्टी असतात. सुप्रसिद्ध साहित्यिक आचार्य अत्रे यांनी आपल्या 'आजीचे घड्याळ' या कवितेत याचं फार सुंदर वर्णन केलं आहे. आचार्य अत्रे म्हणतात, ''रात्रीच्या वेळी आजूबाजूला सारं कसं शांत, शांत झालं असताना, आजीच्या जवळ अगदी तिच्या कुशीत बसून भुताच्या गोष्टी ऐकण्याची मजा काही न्यारीच आहे. भूताची गोष्ट ऐकताना जरा कुठं खुट्ट झालं की, आजीच्या पदराखाली डोकं लपवलं की, भीती कुठल्या कुठे पळून जाते.''

आचार्य अत्रे यांनी मुलांसाठी खूप छान छान गोष्टी लिहिल्या. अगदी अप्रतिम. आमच्या लहानपणी, म्हणजे चाळीसेक वर्षांपूर्वी 'नवयुग वाचनमाला' नावाची क्रमिक अभ्यासाची पुस्तकं होती. त्या पुस्तकात इतक्या मस्त गोष्टी असायच्या की, दुसरं पुस्तक वाचावंसंच वाटत नसे. त्या पुस्तकातल्या 'दिनूचे बील', 'चांदोबाचा अंगरखा' अशा कितीतरी गोष्टी आजसुद्धा मनाला आनंद देतात. अजूनही पुस्तकांच्या दुकानात गेले की, हटकून नवयुग वाचनमाला मागावीशी वाटते आणि ती नाही मिळाली की, निराश वाटतं.

पुढे मोठी होता होता खूप गोष्टी वाचल्या. त्या वाचत असताना लक्षात आलं की, गोष्टी नुसत्या वाचून नाही चालणार. त्या ऐकल्या पाहिजेत आणि सांगितल्यासुद्धा पाहिजेत. आपल्या एकूण पुराणग्रंथात मी वाचलं की, एका राजपुत्राला गोष्टी ऐकण्याचा फार म्हणजे फारच नाद होता. तो आपला सारख्या गोष्टी ऐकायचा. पण त्याच गोष्टी सांगण्याच्या बाबतीत मात्र महाकंजूष होता तो. त्यानं इतरांना गोष्टी न सांगितल्यानं त्या गोष्टी राहिल्या त्याच्या पोटात. त्यामुळे त्या पाच गोष्टी रागावल्या. रात्री राजपुत्राला गाढ झोप लागली असता त्याच्या उघड्या तोंडाचा फायदा घेऊन झाडावर जाऊन बसल्या आणि राजपुत्राला काय शिक्षा करावी याचा विचार करू लागल्या. सुदैवाने राजपुत्राला वेळीच जाग आली. त्यानं गोष्टींची क्षमा मागितली आणि सर्वांना गोष्ट सांगायला सुरुवात केली. पूर्वी तर म्हणे गोष्टी ऐकून माणसांची दुखणी बरी व्हायची. एका राजाला पोटदुखीचा आजार होता. राजा रोज गोष्टी ऐकायला लागला आणि त्याची पोटदुखी पार पळून गेली.

तर अशा या गोष्टी. वेगवेगळ्या देशांच्या, भाषांच्या, प्रकारांच्या दरवेळी मी तुम्हाला एक वेगळी गोष्ट सांगणार आहे. पण हल्लीच मला एका मुलानं एक अशी काही गोष्ट सांगितली की, ज्याचं नाव ते!

झालं असं की पाचगणीतल्या एका शाळेत एक नाही, दोन नाही, चांगली १२० आदिवासी मुलं राहतात. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागांतून ती तिथं आली आहेत. त्यांना भेटायला, त्यांच्याशी गप्पा मारायला मी नेहमी जाते तिथं. त्यांना गोष्टी सांगते, त्यांच्याशी गप्पा मारते, ती मला गोष्टी सांगतात.

एकदा अशाच गप्पा मारताना अचानक स्वर्गाचा विषय निघाला. स्वर्ग म्हणजे काय, हे सांगण्याची मुलांमध्ये अहमहमिका लागली. विषय हळूहळू पृथ्वीवरच आपण स्वर्ग



निर्माण करू शकतो का, या कल्पनेवर आला. मुलांनी पृथ्वीवर स्वर्ग निर्माण करण्याची कल्पना एकदम उचलून धरली. मुलं आपापल्या स्वर्गीय कल्पना सांगू लागली. मध्येच एकदम शिवा नावाचा मुलगा उठला. म्हणाला, 'माझा स्वर्ग कसा आहे ते सांगतो.' शिवानं आपली स्वर्गाची कल्पना गोष्टीरूपानं आम्हाला सांगितली. तो म्हणाला, 'एकदा माझा भाऊ आणि मी सायकलवरून आमच्या गावाकडे निघालो होतो. मी मागच्या सीटवर होतो. अचानक आम्हाला रस्त्याच्या कडेला बसलेले एक आजोबा दिसले. बसचे पैसे नसल्यानं ते तसेच रस्त्याच्या कडेला बसून होते. आम्ही त्यांची चौकशी केली. सगळी परिस्थिती कळल्यावर आम्हाला खूप वाईट वाटलं. मी सायकलवरून खाली उतरलो. आजोबांना नीट सायकलवर बसवलं. माझ्या भावानं त्यांना सांभाळत हळूहळू सायकल पुढं न्यायला सुरुवात केली. मी पायीच गावची वाट पार केली. गाव चांगलं आठ-दहा मैल दूर होतं. पण मला त्याचं काहीच वाटलं नाही. माझा भाऊही सायकलवर चढून बसला नाही. आजोबांना बसवून त्यानं सायकल चालवत आणली. आजोबा आरामात आपल्या गावी पोचले, याचा आम्हाला खूप खूप आनंद झाला. तोच आमचा स्वर्ग.''

शिवाची ही गोष्ट मी ऐकली, त्याला चांगला पंधरवडा उलटून गेला. पण माझ्या मनात शिवाच्या स्वर्गाची गोष्ट अगदी पक्की बसली. लिहायला बसले आणि शिवाची 'माझा स्वर्ग' हीच गोष्ट आठवली. वाटलं, या आदिवासी गोष्टींनंच आपल्या या 'कथामालेची' सुरुवात करू या. शिवाय शिवाची ही पहिली गोष्ट, मुलांना नेहमी निरनिराळ्या गोष्टी सांगणाऱ्या साने गुरुजींना अर्पण करू या, असंही वाटलं. कारण गुरुजींना शिवाची गोष्ट तर आवडली असतीच, पण शिवाही आवडला असता.

-------------------------------------------

**रेणू गावस्कर**
७ इंदिरा अपार्टमेंट, चिंतामणीनगर,
सहकारनगर, नं. २, पुणे ४११ ००९.
भ्रमणध्वनी : 9850894504

-------------------------------------------



महाराष्ट्र शासन
तिरंग्याला प्रणाम
सप्तरंगी विकासाचा
▸ राष्ट्रीय सुरक्षा दलाच्या धर्तीवर 'राज्य सुरक्षा दल' स्थापणार.
▸ पोलीसदलाच्या आधुनिकीकरणासाठी भरीव तरतूद.
▸ शहरांच्या विकासासाठी जवाहरलाल नेहरू नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत देशात सर्वाधिक निधी प्राप्त.
▸ परकीय आणि देशांतर्गत गुंतवणुकीत महाराष्ट्र सदैव अग्रणी.
▸ राज्यात ११६ विशाल प्रकल्पांना मंजुरी. १,४१,१५३ कोटी रुपयांची गुंतवणूक.
▸ कृषी कर्जमाफी व कर्ज परतफेड सवलत योजना - २००९ अन्वये शेतकऱ्यांना दिलासा.
- महाराष्ट्र शासनाच्या वतीने ४०.१५ लाख शेतकऱ्यांना - रु.६२०८ कोटीचा लाभ.
- केंद्र सरकारच्या योजनेद्वारे ३८ लाख शेतकऱ्यांना रु. ७८७१ कोटीचा लाभ.
▸ अनोखे गृहनिर्माण धोरण - येत्या दोन वर्षांत राज्यात दहा लाख घरे बांधणार.
▸ मागासवर्गीय आणि आदिवासींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आर्थिक तरतूद.
▸ महिला बचतगटांना चार टक्के व्याज दराने कर्ज देण्याचा ऐतिहासिक निर्णय.
▸ आंतरराष्ट्रीय वित्तीय केंद्र म्हणून मुंबईच्या कायापालटाचे काम झपाट्याने सुरू.
आघाडीचे अमुचे शासन
समृद्धीचे सदैव दर्शन
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
अशोक चव्हाण
मुख्यमंत्री
छगन भुजबळ
उपमुख्यमंत्री

एन.डी.नं. आर.एन.आय.१६०१/५७
रजि.क्र.एल-२/आर.एन.पी./पी.एन.सी.डब्ल्यू./डब्ल्यू-१७८/२००९-२०११
तिकिटाशिवाय पाठवण्याचा परवाना नं.७
पोस्टींग दर गुरुवारी मार्केट यार्ड पी.एस.ओ.सॉर्टिंग ऑफिसमधून


# साहित्य अकादमी पुरस्काराने पुरस्कृत

## श्याम मनोहर यांच्या समग्र कथांचा संग्रह




रु.३००.००

श्याम मनोहर यांची इतर प्रकाशित पुस्तके:-

**कादंबरी**

हे ईश्वरराव... हे पुरुषोत्तमराव : रु.४५.००

शीतयुद्ध सदानंद : रु.११०.००

कळ : रु.२००.००

खूप लोक आहेत ! : रु.१७५.००

उत्सुकतेने मी झोपलो : रु.२२५.००

**नाटक**

प्रेमाची गोष्ट? : रु.९५.००

दर्शन : रु.६५.००

**पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.**

३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ ☎ २३५३०३०३

Email : info@popularprakashan.com Website: www.popularprakashan.com